म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २९८६५

IRBK-0121865

# माझा खेळ मांडू दे

( सामाजिक नाटक )

सई परांजपे

IRBK-0121865

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी, सौ. मीरा रानडे, १२१२ आपटे रस्ता, पुणे ४ या पत्त्यावर लिहून लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सई परांजपे

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१ डिसेंबर १९८६

मुखपृष्ठ
नलेश पाटील

मूल्य २५ रुपये

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
टिळक रस्ता, पुणे ३०

प्रिय मीरा,

चिंचा-कैऱ्यांच्या शाळकरी दिवसांत आपली ओळख झाली. दोस्ती झाली. मग आले कॉलेजातले मंतरलेले दिवस. त्या काळात आपली मैत्री बहराला आली. पुढे जसजशा आपण पोक्त होत गेलो, तशी तीही परिपक्व होत गेली. कितीक उन्हाळे, पावसाळे आले, गेले. आता सावल्या हळूहळू लांब होत चालल्या आहेत. पण आपली मैत्री अजून टवटवीत आहे.

तशा आपल्या वाटा किती वेगळ्या. तू छान घरकुल मांडलंस. तुझा प्रसन्न संसार पाहून मी सुखावले. माझी नौका वादळी सागरात अनेक वेळा डगमगली. पण प्रत्येक वेळा तू हाती कंदील घेऊन किनाऱ्यावर उभी राहिलीस. दीपस्तंभ बनून मला कायम प्रकाश दिलास.

मी ? कृतज्ञतेची खूण म्हणून आज मी माझे नवे नाटक तुझ्या ओटीत घालीत आहे.

सई

माझा खेळ मांडू दे "चा शुभारंभाचा प्रयोग शनिवार २७ सप्टेंबर १९८६ रोजी, ४ वाजता गडकरी रंगायतन, ठाणे येथे झाला.

## पडद्यामागे

निर्मिती
**कौतुक**
( सई परांजपे फिल्म्स प्रा. लि. नाट्यशाखा )

जाहिरात संकल्पना
**नलेश पाटील**

प्रकाश
**माधव पटवर्धन**

सहाय्यक
**शशिकान्त भावे**

स्थिरदृश्यचित्रण
**संजीव नाडकर्णी**

स्थिरदृश्यसंचालन
**संजय मालवणकर**

संगीत
**राहुल रानडे**

ध्वनी
**दत्ताराम सुतार**

मंचप्रमुख
**ज्ञानेश्वर काळे**

सहाय्यक
**अनिल दळवी, नंदू भोसले**
**दीनानाथ शिरवडकर**

नेपथ्य
**सई परांजपे**

नेपथ्य उभारणी
**तुकाराम आणि मंडळी**

रंगभूषा
**अशोक शिरसाट**

कपडेपट
**वसंत दौंड**

व्यवस्था
**प्रदीप आचार्य**

संपर्क
**बाळ कोचरेकर,**
**छोटू आजगावकर**

सूत्रधार
**संतोष कोचोरेकर**

लेखिका आणि दिग्दर्शिका
**सई परांजपे**

**कलाकार**

( प्रवेशानुसार )

| | |
|---|---|
| सेवा | कारखानीस |
| **रजनी वेलणकर** | **शशिकांत शिर्सेकर** |
| पद्मिनी | टोनी |
| **ज्योती सुभाषचंद्र** | **संदीप कुलकर्णी** |
| मामी | गोवर्धन |
| **सुधा करमरकर** | **चंदू पारखी** |
| रिबेका | डेव्हिड |
| **विनी परांजपे जोगळेकर** | **दिलीप गुजर** |

●



कारखानीस आणि पद्मिनी — शशिकांत शिर्सेकर, ज्योती सुभाषचंद्र.



टोनी आणि रिबेका — संदीप कुलकर्णी, विनी परांजपे जोगळेकर.





डेव्हिड आणि गोवर्धन — दिलीप गुजर, चंदू पारखी.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

मंच रिकामा आहे.

मंचाचे प्रामुख्याने दोन विभाग पाडलेले दिसतात. एक खोली; आणि खोलीच्या मागील बाजूला, जरा उंचावर असा, थेट डावीकडून उजवीकडे जाणारा एक बोळ. बोळाच्या मागील बाजूला, मधोमध एक दार आहे. हे घराचे मुख्य प्रवेशद्वार. बाहेरून येणाऱ्या उपऱ्या किंवा औपचारिक पाहुण्याला बसण्यासाठी दोन चार वेताच्या खुर्च्या बोळात मांडलेल्या दिसतात. कोपऱ्यात एक टेबल आहे. टेबलावर फाइली. थोड्या पानाफुलांच्या कुंड्यांनी बोळाला शोभा आणलेली आहे. मोक्याच्या ठिकाणी ठेवलेला टेलिफोन प्रामुख्याने दिसतो. बोळातून उजवीकडे आत घरात जाण्याचा रस्ता आहे.

मंचाचा अधिकांश आणि तोही पुढचा भाग, एका खोलीने व्यापला आहे. ही खोली बोळापेक्षा थोडी खालच्या पातळीवर आहे. बोळातून एक पायरी उतरून या खोलीत यावे लागते. खोली आणि बोळ यांच्या मधे साहजिकच भिंत आहे, पण ती प्रेक्षकांच्या सोईसाठी काढून टाकलेली आहे. बोळातून खोलीत यायला जो दरवाजा आहे, त्याची चौकट तेवढी उभी आहे. एक लहान पायरीही आहे.

खोलीला डावीकडे एक खिडकी, जिच्या पलीकडे, बाहेरचे विश्व आहे. एक दार मोरीकडे जाते, दुसरे उजवीकडे घराच्या बाजूला. खोलीमध्ये तीन खाटा आहेत. एक कपाट आहे. शेल्फ, टेबल इ. जुजबी सामान आहे.

पडदा उघडल्यानंतर काही काळ स्तब्धता. घंटा वाजते. बोळाच्या उजवीकडून, म्हणजेच घरामधून, घराच्या मालकीणबाई सेवाताई प्रवेश करतात, आणि बाहेरचा दरवाजा उघडतात. दरवाज्यामध्ये पद्मिनी नाईक उभी आहे. तिच्या हातात एक लहान पेटी आहे. सेवाताई हसून तिचे स्वागत करतात आणि बोळ ओलांडून तिला खोलीमध्ये घेऊन येतात.

**सेवा :** या, ही तुमची खोली—

**पद्मिनी :** प्रशस्त आहे.

**सेवा :** तिघीजणींच्यात मिळून आहे ही. तुमच्या दोन रूम पार्टनर्स असतील. इंटरव्ह्यूच्या वेळेला तुम्हाला कल्पना दिलीच होती....हा पलंग मामींचा आहे.

**पद्मिनी :** मामी ?

**सेवा :** तुमच्या एक पार्टनर, अंघोळ करताहेत. आता उरलेल्या या दोन पलंगांमधे तुम्ही निवड करा.

[ पद्मिनी एका खाटेवर पिशवी ठेवते, तिच्याखाली आपली सूटकेस ठेवते. ]

**पद्मिनी :** अरे वाऽ टेबल लँप आहे...[ ऑन–ऑफ करते ] तिसरी कोण आहे, या खोलीत ?

**सेवा :** अजून ठरली नाही. जाहिरात आल्यापासून साठ-सत्तर फोन आले...त्यातल्या सात-आठजणींनाच काय ते भेटायला बोलावलं मी. सगळ्या नापास झाल्या तोंडी परीक्षेत.

**पद्मिनी :** तोंडी परीक्षा ?

**सेवा :** म्हणजेच इंटरव्ह्यू...प्रत्यक्ष भेट.

**पद्मिनी :** काय निकष असतो तुमचा ? काय पाहून पेइंग गेस्ट निवडता तुम्ही ?

**सेवा :** मी देऊ शकत असलेल्या या अल्पशा सवलतीचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा अशी माझी मनोमन इच्छा असते. इथे आसरा शोधणारी स्त्री खरोखरीच गरजू असली पाहिजे. आप्तमित्र, नातीगोती नसलेली. सासर आणि माहेर...दोहोंना मुकलेली. समाजाला पारखी आणि दुनियेला परकी झालेली—पोरकीच म्हणा ना.

**पद्मिनी :** तुम्ही पुस्तकातल्यासारखं बोलता—

**सेवा :** मी मनातलं बोलते. आणि जे बोलते ते करते. माझ्या कुवतीप्रमाणे समाजकार्य करते मी असं समजा.

**पद्मिनी :** समाजकार्य ? महिना साडेतीनशे रुपये घेऊन ? ते सुद्धा ॲडवान्स ?

**सेवा :** हे पाहा, माझी सक्ती आहे का कुणावर ? साडेतीनशे रुपयांमधे अशी—इतकी चांगली सोय आहे कुठे ? दोनदा चहा, स्वयंपाकघराचा मुक्त वापर, टेलिफोन... असेल तर खुशाल तिकडे जा. माझ्या घराचं दार उघडं आहे. यायला, तसंच जायलाही.

**पद्मिनी :** रागावलात तुम्ही ?

**सेवा :** " जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती " या पंथातील नाही मी. " या, आणि मला लुटा " हा बाणा मला मान्य नाही. कारण कुणासाठी काहीही फुकटात केलं, तर त्याची किंमत नसते असा माझा अनुभव आहे. आणि असं पाहा, माझ्या दारात कल्पवृक्ष का आहे ? मलाही गरजा आहेत, पोट आहे. तेव्हा माझा चरितार्थाचा गाडा तर चालावा, आणि तो रेटता रेटता कुणा अभागिनीला सावरायला थोडी फार मदत झाली तर करावी, एवढीच धडपड असते माझी.

**पद्मिनी :** तुमच्या समाजकार्याला व्यवहाराची झालर आहे तर.

**सेवा :** आता या मामींचीच गोष्ट घ्या. बिचाऱ्या बारा वर्षं—

[ मोरीमधून मामी बाहेर येतात. काखोटीला ओल्या कपड्यांचे पिळे. ]

याऽ मामी ह्या पद्मिनीताई. तुमच्या नव्या रूममेट. ह्या मामी—

**पद्मिनी :** नमस्कार. तुमचं संपूर्ण नाव काय ?

**मामी :** कशाला हवंय संपूर्ण नाव ? रेशनकार्ड का भरायचंय ?

**पद्मिनी :** तसं नव्हे.

**मामी :** ऐका...संपूर्ण नाव सौभाग्यवती वत्सला पुरुषोत्तम जोगदेव. झालं समाधान ? का उखाणा घेऊ ?—आता तुमचं पुरं नाव ?

**पद्मिनी :** पद्मिनी...पद्मिनी नाईक.

**मामी :** आं हां आं हां...पूर्ण नाव. मी कसं साग्रसंगीत नाव सांगितलं ? नवऱ्याचं किंवा बापाचं नाव मधे घातल्याशिवाय म्हणे बाईचं नाव पुरं होत नाही. तुमच पूर्ण नाव काय ? पद्मिनी " कोण " नाईक ?

**पद्मिनी :** पद्मिनी—" कुणी नाही " नाईक...मला हाततोंड धुवायचंय.

[ सेवा मोरीकडे बोट दाखवते. पद्मिनी आत जाते. ]

**मामी :** रागावली—

[ दालनात टेलिफोन वाजतो. बाहेर येऊन सेवा तो उचलते. मामी पलंगाच्या कट्ट्यावरून ओले कपडे वाळत घालू लागतात. लक्ष फोनकडे ]

**सेवा :** हलो...हो हो, मी सेवा श्रॉफ. हां हां येस ऑफ कोर्स आय रिमेंबर यू रिबेका. हो, तुमचा अर्ज आणि रेफरन्स पेपर पाहिले. पण तुम्हाला निश्चित कळवायच्या आधी पुन्हा एकदा भेटलं पाहिजे. नंतरच मी नक्की काय ते सांगू शकेन...कधी येता ?...हो मी मोकळीच आहे. ठीक. ( फोन ठेवते. )

**मामी :** सेवाताई, हे इंटरव्ह्यू म्हणजे तुमचं अखेरचं शस्त्र हो.

**सेवा :** पण दुधारी शस्त्र आहे ते.

**मामी :** म्हणजे ?

**सेवा :** म्हणजे मी उमेदवार स्त्रीची पारख करते, तशीच तिनं माझी करावी. मला नापास करावं. " तुमची खोली नको, " म्हणून खुशाल चालू लागावं.

**मामी :** गरजू असतात बिचाऱ्या. कुठे जाणार ? तुम्ही मला आसरा दिला नसतात, तर मी कुठे गेले असते...काय ? पुन्हा पहिल्या मसणवटीत का दुसऱ्या नरकपुरीत? आं ? सांगा न ? कुठे गेले असते मी ?

**सेवा :** मामीऽ बस बस. पुरे आता. जुन्या आठवणी काढायच्या नाहीत असं ठरलंय न आपलं ? शांत व्हा—हो, तुमची लेस पुरी झाली का ? पाहू तरी कुठवर आलीय ती.

[ मामी जशा अचानक रागावल्या होत्या, तशाच सहजपणे शांत होतात. लेस काढतात. खुलतात. ]

आहा. सायलीच्या नाजुक फुलांचा हारच जसा काही ! लवकर पुरी झाली. खूप ऑर्डरी आल्या आहेत माझ्याकडे.

[ ताजीतवानी होऊन पद्मिनी बाहेर येते. ]

**पद्मिनी :** धावतं पाणी, नळाला चक्क धावतं पाणी. सकाळी साडे दहा वाजता.

**सेवा :** हो, या भागाला सुख आहे पाण्याचं. शिवाय खालचा मजला आहे ना ?

**पद्मिनी :** कपडे वगैरे इथेच धुतले तर चालतील ना ?

**सेवा :** हो तर. तुमची तिघींचीच बाथरूम आहे ती. स्वतंत्र.

**मामी :** माझा फार कटाक्ष असतो हं स्वतंत्र बाथरूमबद्दल. या आधी सुद्धा जिथे मी होते तिथे स्वतंत्र बाथरूमच होती. नव्वद जणींच्यात !

**पद्मिनी :** किती सुंदर लेस आहे, छान विणता तुम्ही.

**मामी :** न विणायला झालंय काय ? बारा वर्षं एवढं एकच काम केलं. दुसरं काही केलं नाही. धागा धागा अखंड विणला. मुखाने 'विठ्ठल विठ्ठल' मात्र नाही म्हटलं. का नाही म्हटलं विचारा.

**पद्मिनी :** का ?

**मामी :** कारण विठ्ठल पुरुष. देव असला तरी पुरुषच ना ? [ सेवाला ] या पद्मिनीबाईंना नियम समजावून सांगितलेत ना ? या खोलीत पुरुषांना मज्जाव आहे. जवळचा नातेवाईक असला तरी.

**पद्मिनी :** माझे सगळे नातेवाईक मला मेले आहेत, आणि मी त्यांना. इथे मला भेटायला येईल असा कोणी पुरुष ओळखीचा नाही माझा.

**मामी :** आता नसेल. पुढचं कुणी सांगावं ? तुम्ही नोकरी करता ना ?

**पद्मिनी :** हो

**मामी :** मग ?

**पद्मिनी :** सात वर्षं झाली बँकेत नोकरी पत्करून. आता यापुढे तुम्ही म्हणता तसा धोका निर्माण होण्याची शक्यता कमीच...तुम्ही करता कुठे नोकरी ? काम ?

**मामी :** माझं हेच काम. लेसी विणणं, भरतकाम करणं. एका पारसी संस्थेला विकते

मी. मोठी ऑर्डर असते त्यांची. . .तुमच्या बँकेत विचारा न कुणाला लेस हवी असेल तर.

**पद्मिनी :** बँकेत ?

**मामी :** हो. बायका असतीलच की तिथे तुमच्याखेरीज इतर. परकराची छान लेस देईन विणून.

**पद्मिनी :** हल्ली परकराला कुणी लेस लावीत नाही. गेली ती फॅशन.

**मामी :** मग पडदे...टेबलक्लॉथ...

**पद्मिनी :** विचारीन. चांगलं काम काढलं आहे तुम्ही.

**मामी :** घरबसल्या मिळकत. काय म्हणतात सेल्फ...

**सेवा :** सेल्फ-एम्प्लॉइड.

**मामी :** हो, बाहेर पडायला नको. पुरुषांचा संपर्क नको.

**पद्मिनी :** पुरुषजातीचा इतका तिटकारा ?

**मामी :** या जन्मात पुन्हा पुरुषाची सावली पडली नाही अंगावर तर मी भाग्यवान समजेन स्वतःला.

**सेवा :** पण मामी, आता पुरुषांपासून काय भीती आहे तुम्हाला ?

**मामी :** काय भीती आहे ? अहो अशी अधम जात आहे, की खोबरं खातील ते खातील, करवंटी पण सोडणार नाहीत.

**सेवा :** मामी !

**मामी :** मी ही लेस तुमच्या खोलीत ठेवून येते.

[ मामी लेस घेऊन आत जातात. ]

**पद्मिनी :** मला स्वतःला पुरुषजातीबद्दल लळा नाही, पण हे फारच जहाल झालं; या मामींचं.

**सेवा :** तुम्हाला त्यांचा इतिहास ठाऊक नाही म्हणून–बिचाऱ्या. [ घंटा ]–आलं कुणीतरी.

**पद्मिनी :** गडी माणूस नाही का कुणी ?

**सेवा :** आहे ना. गंगाराम. पण तो बाजारात गेलाय. आणि मामी आल्यापासून तो बाहेर बाहेरच असतो. घाबरतो बिचारा त्यांना.

[ मामी परस्पर आतल्या वाटेने दालनाच्या दुसऱ्या टोकाने येऊन दरवाजा उघडतात. एक तरुण अद्ययावत कपडे केलेली स्मार्टशी मुलगी आत येते. ही रिबेका ]

**रिबेका :** मिसेस श्रॉफ ? सेवा श्रॉफ ?

**मामी :** आपण ?

**रिबेका :** मी रिबेका. रिबेका जोसेफ.

[ सेवा बाहेर येते. मामी परत आत खोलीत ]

**सेवा :** नमस्कार. मी सेवा श्रॉफ...तुम्ही...तू ?

**रिबेका :** रिबेका, रिबेका जोसेफ.

**सेवा :** एवढ्यात आलीस ? आताच तर तुझा फोन आला होता.

**रिबेका :** शेजारच्या केमिस्टकडून केला होता...माझं ॲप्लिकेशन— ?

**सेवा :** आहे. तुझी फाईल काढूनच ठेवलीय मी. बस.

[ रिबेका बाहेरच्या खुर्चीत बसते. सेवा कोपऱ्यामधल्या टेबलावरच्या फाइली शोधते ]

**मामी :** चटकचांदणी आहे कुणीतरी. पोरगेली आहे, नाव विचित्र आहे.

**पद्मिनी :** कायआहे ?

**मामी :** काय की. कुणीतरी अक्का म्हणाली बाई—

**रिबेका :** हां हां. तेच पत्र आहे माझं. निळा कागद. काळी शाई.

**सेवा :** अरे वा, जोसेफ असून मराठी चांगलं येतं तुला—

**रिबेका :** हो, मिशनमध्ये दोन आया, आणि एक सिस्टर मराठी होत्या. शिवाय शाळेत मराठी होतं मला ( गाऊ लागते ) "खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या, उडविन—"

**सेवा :** अच्छा, अच्छा, शाबास.

**रिबेका :** तुम्ही पण श्रॉफ म्हणजे गुजु. गुजु असून मराठी चांगलं बोलता—

**सेवा :** मी मराठी. लग्न गुजराथ्याशी केलं.

**रिबेका :** ओऽ

**सेवा :** [ रिबेकाची फाईल चाळीत ] तुला पगार चांगला मिळतो रिबेका.

**रिबेका :** पगार कसा ? मी नोकरी नाही करत. आयम् अ फ्री लान्स मॉडेल. असलं तर खूप काम, नाहीतर काहीच नाही. ऊनपावसाचा खेळ. राइट नाव इट्स ब्राईट सनशाइन.

**सेवा :** गुड...रिबेका फिक्सड इनकम नसला तरी सरासरी चांगलीच मिळकत आहे तुझी. [ रिबेका खांदे उडवते ] तू या साध्या ठिकाणी, साध्या लोकांच्यात कशासाठी यायला पाहतेस ? एखाद्या पॉश लोकॅलिटीमधे स्वतःचा छानसा फ्लॅट भाड्यानं घेता येईल तुला.

**रिबेका :** ते खरं, पण मी-मला—

**सेवा :** माझं म्हणणं असं की ही जागा एखाद्या गरजू मुलीला देता येईल—

**रिबेका :** पण मीसुद्धा खरोखर गरजू आहे हो. पैशानं नसेन, पण मला—

[ दारामध्ये मामी उभ्या, ऐकताहेत. त्यांच्याकडे लक्ष जाऊन रिबेका मधेच थांबते ]

**सेवा :** चल. आपण आत माझ्या खोलीत निवांत बसून बोलू—

[ दोघी उठून आत जातात. ]

**मामी :** काहीतरी खासच स्टोरी दिसत्येय बयेची.

**पद्मिनी :** अशी काय मुलखावेगळी कहाणी असणार आहे ?

**मामी :** माझी आई म्हणायची, आपल्या या भूमीमधे दगडादगडागणिक एक अहिल्या आहे, आणि प्रत्येक अहिल्येची एक वेगळीच कहाणी आहे.

**पद्मिनी :** लहान दिसते वयानं.

**मामी :** बरंय की. तरुण रक्त आसपास उसळत असलं की आपलं वय विसरायला होतं.

**पद्मिनी :** उलट आहे माझं. मला आपल्या वाढत्या वयाचं ओझं अधिकच जाणवतं.

**मामी :** असं काय वय आहे तुझं ? तुमचं ?

**पद्मिनी :** ओळखा.

**मामी :** तिशीच्या अलीकडे पलीकडे ?

**पद्मिनी :** अलीकडे. तुमचं !

**मामी :** पलीकडे. पाऽर पल्याऽड.

[ पद्मिनी पेटीमधून बांगड्यांचं वेटोळं काढते. दोऱ्यात ओवलेलं. ते पडतं. दोन चार बांगड्या फुटतात ] अर्रर्र बांगड्या कशाला पाडल्यास !

**पद्मिनी :** तीन फुटल्या—

**मामी :** आंहांहां ! " फुटल्या " नाही; " वाढवल्या " म्हणावं. बांगड्या फुटत नसतात. वाढवतात. फुटतं ते नशीब...च्च्. बांगड्या वाढवल्या तर वाईट असतं, अपशकुन होतो म्हणे.

**पद्मिनी :** मला काही भीती नाही. माझ्या वाटचे सगळे अपशकुन आधीच होऊन गेले आहेत. आता मी निर्धास्त आहे.

**मामी :** आवड दिसत्येय बांगड्यांची.

**पद्मिनी :** हो, खूप लहानपणापासूनच. सुंदर सुंदर रंग आणि गोड नादमधुर आवाज. किणकिणकिण...

**मामी :** मला नाही आवडत हा आवाज. बांगड्यांचा आवाज म्हणजे बायकांच्या गुलामगिरीची नांदी.

**पद्मिनी :** कशी ?

**मामी :** लग्नामध्ये नव्या नवरीला कोपरापर्यंत बांगड्या चढवायच्या. 'सौभाग्यलेणं' म्हणून. खरा उद्देश काय ? सून काय करते त्याची वार्ता मिळत राहावी. सून पाखडत्येय, का कांडत्येय, का दळत्येय, का भाजी चिरत्येय, का नुसतीच हातावर हात देऊन बसून राहलीय, हे बांगडीच्या आवाजावरून कळतं...बाईच्या प्रत्येक दागिन्यामागे एक डाव आहे बरं. जोडवी का घालायची पायात ? तर बाईची पावलं वाजली पाहिजेत. खण् खण् खण्. कुठे गेली ? फार दूर तर नाही गेली ! भलतीकडे

तर नाही गेली ! नाही. स्वयंपाकघरात आहे. . .ही पाहा, माजघरात गेली, आता ओसरीवर आली. . .पुढे अंगणात. . .अंगणामधून परसात. . .परसातून विहिरीकडे. . . खणू खणू खणू. . .हे काय ! विहिरीच्या काठावर चढली ?

[ सेवा आणि पाठोपाठ रिबेका आत येतात. ]

**पद्मिनी** : वाचली बिचारी !

**सेवा** : मामी, पद्मिनीताई, आता इथला कोरम पुरा झाला. ही तुमची तिसरी पार्टनर. रिबेका, रिबेका जोसेफ.

**पद्मिनी** : नमस्कार.

**रिबेका** : हाय. ॲब्सोल्यूटली डिलाइटेड टु मीट यू.

**मामी** : हेच मराठीत सांग बरं. काय म्हणाली ही ?

**सेवा** : म्हणाली, ' नमस्कार '.

**मामी** : एवढं लांबलचक बोलली ते काय एवढंच ? नमस्कार ?

**पद्मिनी** : मामी, आपण मराठी लोक " वाहवा, तुम्ही भेटलात, मनाला फार संतोष झाला. " असं कुठे म्हणतो ? जेमतेम एक कोरडा रुक्ष नमस्कार करून मोकळे होतो आपण.

**रिबेका** : अच्छा, तुम्ही दोघी घाटी आहात ?

**मामी** : ( कुऱ्यात ) मराठी आहोत आम्ही.

**सेवा** : अच्छा, चालू दे तुमचं. सेटल डाऊन. मला माझी कामं करू देत. काही लागलं तर सांगा.

[ सेवा आत तिच्या खोलीत निघून जाते ]

**मामी** : तू ? तू काय आहेस ?

**रिबेका** : मी ? आयम् अं बॅाबे प्रॉडक्ट. बंबईना बोर खट्टामीठा बोर. मी थोडी ॲंग्लो, थोडी पारसी, थोडी सिंधी, पंजाबी, गोआनीज, तोडी मद्रासीऽ जीऽ, थोडी गुजुबेन आणि थोडी घाटी बरं का.

**मामी** : तुझे आईवडील कोण होते ?

**रिबेका** : तीच तर गंमत आहे. आई वडीलच नव्हते मला. मी स्ट्रेट आभाळातून पडले ती मर्सी मिशनमध्ये. प्डुंग ! मी मिशनमधेच वाढले. तिथेच मला नाव मिळालं रिबेका जोसफ. हाउ डु यु डू. हॅपी टु मीट यू.

**पद्मिनी** : रिबेका जोसफ—

**मामी** : म्हणजे ख्रिश्चन ?

**रिबेका** : एनी ऑब्जेक्शन ?

[ दोघींकडे डाफरून पाहते. ]

**मामी** : ख्रिस्ती असशील तर अस बापडी. इथे येण्याआधी मी जिथे होते न—बारा

वर्षं—तिथे जात, गोत, धर्म, कुळ सगळं सगळं काही धुऊन सारवून पुसलं गेलं. आता पाटी कशी लख्ख कोरी आहे. करकरीत.

**रिबेका :** गुड!

**मामी :** हंऽ वय काय तुझं?

**रिबेका :** ए सर्टिफिकेट आहे माझ्याकडे. आयम ॲन ॲडल्ट.

**पद्मिनी :** काय काम करतेस?

**रिबेका :** मॉडेल आहे.

**मामी :** म्हंजे?

**रिबेका :** तुम्ही कुठला शांपू, टूथपेस्ट आणि साबण वापरायचा ते मी ठरवते. कुठल्या कंपनीचा मिक्सर, फ्रिज, फॅन, बिस्किट, अंडरवेअर आणि खोकल्याचं औषध तुम्ही घ्यावं, हे मी तुम्हाला सांगते.

**मामी :** ते कसं?

**रिबेका :** हे असं—

[ एखाद्या सराइत मॉडेलप्रमाणे ती प्रात्यक्षिक करते. ]

शिकेला शांपू!

मेरे लंबे, घने और रेशमी बालोंका रखवाला, है खुशबूदार शांपू—शिकेला.

ऊ लाला, शिकेला...शिकेला...शिकेला!!!

**मामी :** फॅशनेबल बायकांसाठी बरं ही सगळी थेरं.

**रिबेका :** गृहिणींसाठी सुद्धा खुषखबर आहे बरं का...

अग सुशीला, तू उदास का बरं?—काय सांगू प्रमिला, माझा स्वयंपाक अगदी बेचव होतो बघ. म्हणून पतिदेव नाराज, आणि मुलं दुर्मुखलेली असतात. तुझ्या सुग्रणपणाचं रहस्य तरी काय?...

हात् वेडे. अगदीच सोपं. माझ्या सुग्रणपणाचं रहस्य—"पतंग छाप हिंग." रुचकर, सुवासिक आणि भरपूर विटामिन्सयुक्त. "पतंग छाप हिंग" वापरायला लागल्यापासून माझा संसार सुखाचा झाला. यांना नोकरीमध्ये वढती मिळाली. आणि राहुलचा वर्गात पहिला नंबर आला.

तुमच्या यशाचा पतंग
मारी भरारी उत्तुंग
नेहमी ठेवा संग
पतंग छाप हिंग—

[ मामी, पद्मिनी हसतात. ]

**मामी :** बस कर ग, पोटदुखी होईल तुझ्या हिंगानं.

**रिबेका :** पोटदुखी? अपचन? पोटाच्या कोणत्याही तक्रारीवर खात्रीलायक इलाज,

पाच्को !! एकच गोळी खाऊन पाहा, तत्काळ प्रक्रिया सुरू होते. पाच्को आता तीन नवीन स्वादांमधे उपलब्ध. व्हॅनिला, चॉकलेट आणि केशर !
पोटदुखीला पूर्णविराम,
पाच्को घ्या, तत्काळ आराम...ऊप्स् एक्सक्यूज मी—
[ मोरीपर्यंत जाते पळत...आणि परत डोकावते. ]

**मामी :** काय मेली नकला करते. बघ, मी म्हटलं नाही, तरुण रक्त आसपास असलं की वय विसरायला होतं...तू प्रथम हसलीस, आल्यापासून.

**पद्मिनी :** हसायची सुद्धा सवय मोडते की काय कोण जाणे ?

**मामी :** ( रिबेकाला ) पण काय ग, तू चांगली मजेत दिसतेस, जॉली एकदम.

**रिबेका :** मी मजेत असायला तुमची काही हरकत ?

**मामी :** अग आमची कशाला एकसारखी हरकत असतीय ? हां, सेवा बाई मात्र इथे फक्त दुःखीकष्टी बायकांनाच थारा देतात. आमच्यासारख्या रडूबाई गरजवंतांना. तू आहेस गरजवंत ?

**रिबेका :** [ विषय बदलीत ] एकच कपाट आहे इथे ? तिघींच्यात ?

**पद्मिनी :** हो, प्रत्येकीला एकेक कप्पा.

**रिबेका :** गॉश ! माझं तर मेकपचं सामान सुद्धा नाही मावणार एका कप्प्यात.

**पद्मिनी :** आहे कुठे सामान तुझं ?

**रिबेका :** आणायचंय. आता मी इंटरव्यूला आले होते न ? मला जागा मिळणारच अशी खात्री कुठे होती ? जाऊन घेऊन येईन सूटकेसेस. तुझं एवढंच सामान ?

**पद्मिनी :** हो. ही पेटी आणि थोडे कपडे इथे येण्याआधी विकत घेतले मी. नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर पडले ना ? नवऱ्याच्या घरातून.

**मामी :** इतक्या तडकाफडकी ?

**पद्मिनी :** तडकाफडकी ? नाही. पाच वर्षं तडफड तडफड तडफडले आणि मग एक असा क्षण आला. काय म्हणतात—लास्ट-स्ट्रॉ.

**रिबेका :** द स्ट्रॉ दॅट ब्रोक द कॅमल्स बॅक.

**पद्मिनी :** हो. कणा पार मोडून गेला माझा, आणि मग...

**मामी :** नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडलीस...माहेरी नाही गेलीस ?

**पद्मिनी :** माहेरी गेले. तिथे दादाची बायको, पोरांचा रगाडा, माझ्या लग्न न झालेल्या बहिणींची सुकलेली तोंडं. दादा म्हणाला मला "इथे कशाला आलीस ? चुलीतल्या लाकडानं चुलीतच जळावं." एकदा माहेर तुटलं की हक्कानं जाता येत नाही हेच खरं. गेलं तर कौतुकापुरतं जावं. मंगळागौरीला, पहिल्या दिवाळसणाला, पहिल्या बाळंतपणाला. बस्स.

**मामी :** पण घर का सोडलंस तू ? पाच वर्षांच्या संसाराकडे का पाठ फिरवलीस ?

[ पॉझ ] नसलं सांगायचं तर राहू दे हो [ पॉझ...पद्मिनीचा येरझरा ]

**पद्मिनी :** सांगू ? सांगते. झालीच तर मनातली मळमळ कमी होईल...अतिशय गरीब कुटुंबात जन्म झाला. वडील पोस्टात कारकून. तेही रिटायर्ड. आई दमेकरी. एक बहीण जन्मापासून अपंग. अशा परिस्थितीत सुद्धा वडिलांनी मला मोठ्या जिद्दीनं शिकवलं. मी बी. कॉम. झाले. लग्नाचं निघालं. घरची गरिबी. पाठीमागच्या दोन बहिणी. पत्रिकेत मंगळ आणि नाकाला जाड चष्मा. अशी मी लग्नाच्या बाजारात दाखल झाले.

**रिबेका :** नाकाला चष्मा ? कुठाय ?

**पद्मिनी :** सांगते. तर असा सगळा नन्नाचाच पाढा होता. हां, एक बाजू भक्कम होती. नोकरी ! ती सुद्धा बँकेत. एक दोन वर्षं स्थळ शोधणं, मला दाखवणं आणि नकार झेलणं, असं दुष्टचक्र चालू होतं. आणि मग अचानक मला मागणी आली. घरचे लोक हरखून गेले. खोटं कशाला सांगू ? मला सुद्धा मनातल्या मनात गुदगुल्या झाल्या. विशेष म्हणजे मुलगा देखणा होता. उंचापुरा आणि सशक्त. पण बस्स ! जमेची बाजू एवढीच होती. तो जेमतेम शिकलेला होता, नोकरी पण बेताचीच होती. म्हणजे माझ्यापेक्षा पगार खूप कमी होता त्याला. त्यातून उडत उडत कानावर बातमी आली होती की मुलाची एका परप्रांतीय मुलीशी काही भानगड आहे...आणि म्हणून त्याच्या घरच्यांची लग्नाची घाई चालली होती. पण आम्ही तिकडे कानाडोळा केला. कसंही असलं तरी स्थळ होतं. चालून आलेलं. आमच्या नकाराचा प्रश्नच नव्हता.

**रिबेका :** बेगर्स कान्ट बी चूजर्स...

**पद्मिनी :** बरोबर. माझं लग्नं लागलं. वडिलांनी आपल्या परीनं हौस केली. रीतसर लग्नखर्च केला. हुंडा, मानपान, स्टीलचं कपाट, स्टेनलेसचा संसार आणि टी. व्ही. सेट घेऊन दिला. हे सगळं त्यांनी कर्ज काढून उभं केलं...हा एवढा खटाटोप कशासाठी ? तर नावाआधी "सौभाग्यवती" हे बिरुद मिरवता यावं म्हणून. 'पद्मिनी नाईकच्या' मध्ये 'अरविंद' हे नाव घालता यावं म्हणून... पण गंमत अशी की या अरविंदानं माझ्या गळ्यात मंगळसूत्र घातलं ते फुटक्या मण्यांचं.

[ घंटा वाजते. आतून येऊन सेवा दार उघडते. मध्यमवर्गीय, सभ्य दिसणारा असा पन्नाशीचा एक इसम दारात उभा. कारखानीस. ]

**कारखानीस :** नमस्कार. आपल्या इथे पद्मिनी नाईक राहतात ?

**सेवा :** राहतात म्हणजे, आजच आल्या आहेत त्या...काय काम होतं ?

**कारखानीस :** त्यांना भेटायचं होतं. जरा व्यक्तिगत काम आहे. महत्त्वाचं. भेटायला बंदी तर नाही ना ?

**सेवा :** तशी बंदी नाही...पण व्हिजिटर्सची फारशी ये-जा असू नये अशी अपेक्षा आहे आमची.

**कारखानीस** : अस्सं...खरं म्हणजे तसंच महत्त्वाचं काम होतं. नाहीतर आलो नसतो मी. मी—त्यांच्याच बँकेत काम करतो. कारखानीस.

[ आत येते ]

**सेवा** : बसा ...पद्मिनी, तुला भेटायला कुणी कारखानीस आले आहेत.

**पद्मिनी** : अगबाई, इथे ? [ ती बाहेर येते ]

नमस्कार. इकडे कसे काय ?

**कारखानीस** : माफ कर. तू अगदी इथे दाखल झाल्याझाल्याच मी पाठोपाठ येऊन धडकलो. तुझ्या लँडलेडीनं जरा समज दिली मला. पण तसंच काम निघालं, म्हणून आलो. या फॉर्मवर सही राहूनच गेलीय. माझा वकील मित्र आज संध्याकाळी घरी येणार आहे माझ्या. पी. डी. आगाशे. तो आजच फॉर्म नेणारे. [ ती फॉर्म वाचू लागते ] तुझा बेत बदलला नाही ना ?

**पद्मिनी** : बेत बदलणं शक्य नाही...पण काम होईल ना ?

**कारखानीस** : व्हावं...वेळ लागेल, पण काम होईल असं वाटतं. आगाशे इज व्हेरी होपफुल... यू हॅव्ह जस्टिस ऑन युवर साइड.

**पद्मिनी** : हुं..... नेहमी जगात न्याय मिळतो ?

[ दोघे एकमेकांकडे पाहून विषण्ण हसतात ]

**कारखानीस** : जम बसला का व्यवस्थित ?

**पद्मिनी** : हो. छान जागा आहे. प्रशस्त. दोघीजणी आहेत माझ्या बरोबर खोलीत. सेवाताई खूप चांगल्या वाटतात. शिस्तप्रिय आहेत मात्र.

**कारखानीस** : हो. त्यांच्या दक्षतेची चुणूक पाह्यला मिळाली आताच. [ पद्मिनी फॉर्मवर सही करते. ]

**पद्मिनी** : हे घ्या. तुम्हाला उगाच हेलपाटा पडला.

**कारखानीस** : हेलपाटा कसला ? तेवढंच बाहेर पडायला निमित्त मिळालं रविवारचं. तसा रविवार म्हणजेच माझा खरा कामाचा दिवस. प्रचीतीचा पण.

**पद्मिनी** : हो. ( पॉझ ) कशी आहे मिसेस कारखानिसांची तब्येत ?

[ उत्तर नाही. पुन्हा पॉझ ]

**कारखानीस** : बराय येऊ मी ?

[ जातात. पद्मिनी परत आत येते ]

**रिवेका** : पुढे सांग ना—

**पद्मिनी** : अं...काय...?

**मामी** : तुझी कहाणी. कर्मकहाणी.

**रिवेका** : तुझं लग्न झालं. तुझ्या गळयात मंगळसूत्र बांधलं—

**मामी** : फुटक्या मण्यांचं. पुढे काय झालं ?

**पद्मिनी :** पुढे काय व्हायचंय ? लग्न झाल्यावर उजळमाथ्यानं तो त्या बाईबरोबर फिरू लागला. मी फक्त नावाचीच बायको आहे असं त्यानं मला स्पष्ट सांगितलं. अर्थात हक्काची बायको म्हणून सुरुवातीला त्यानं नवरेपणाचा हक्क बजावलाच. पण— तेव्हाही, 'त्या' क्षणीसुद्धा तो तिचं नाव घेत असे...पुढे पुढे नवी नवलाई संपली आणि तो रात्र रात्र बाहेर राहू लागला.

**मामी :** तुझ्या सासरी कुणी आवाज नाही उठवला ?

**पद्मिनी :** उठवला—माझ्या विरुद्ध. माझ्यातच काहीतरी कमी आहे. नवऱ्याला मी घरी खिळवून ठेवू शकत नाही. अशी वेंधळी अजागळ बायको मिळाली म्हणून तो बाहेर फिरतो. माझ्याबरोबर बाहेर पडायला त्याला लाज वाटते वगैरे वगैरे. एका नणंदेच्या आग्रहावरून मी एक पगार खर्चा करून कॉंटॅक्ट लेन्सेस बसवून घेतले. तेव्हा तो म्हणाला, "चष्माच बरा होता, चेहरा जरा तरी झाकला जायचा."

**रिबेका :** व्हॉट ॲन इडियट. आय थिंक यू आर अट्रॅक्टिव...

**मामी :** मेल्यानं मग लग्न तरी कशाला केलं तुझ्याशी ?

**पद्मिनी :** माझ्या पगारासाठी. बॅंकेतल्या नोकरीला फार महत्त्व असतं हे मला नंतर कळलं. लोन मिळतं आम्हाला. कॉंटॅक्ट लेन्स प्रकरणानंतर माझा पुरा पगार मी सासूबाईंना देऊ लागले. पण तेवढ्यावर त्यांचं समाधान होईना. लग्नात दिलेला टी. व्ही. ब्लॅक ॲंड व्हाईट, तेव्हा मी लोन काढून कलर टी. व्ही. घेतला.... नणंदेला शिवायचं मशीन घेऊन दिलं...इतकं करूनही घरात चहूबाजूंनी छळवाद होतच होता. घरी स्वयपाकपाणी करायचं, तासभर लोकलमध्ये उभं राहूनऑफिसात जायचं, दिवसभर तिथे राबायचं, पुन्हा लोकल, पुन्हा घर, संध्याकाळचा स्वयंपाक...

**रिबेका :** पाच वर्षं निमूटपणे कसं सहन केलंस तू ?

**पद्मिनी :** निमूटपणे नाही सहन केलं. पुढे पुढे मीही बोलायला लागले...एकदा खूप थकून ऑफिसातून घरी आले. पाळी होती, आणि मी अगदी मरगळून गेले होते. आल्या आल्या एक कपभर चहा मागितला मी. झालं, सासूबाईंनी आकाशपाताळ एक केलं. बाईची जात, तीही सून—तयार चहा मागते म्हणजे काय ? मीही हट्टाला पेटले. चहा मिळाल्याशिवाय कामाला लागणार नाही म्हणाले.

**रिबेका :** शाब्बास !

**पद्मिनी :** चहा मिळाला. पण रात्री मारही मिळाला. नवऱ्याच्या हातचा. अंगावर वळ पडेपर्यंत मारलं...पण गंमत अशी की या प्रकरणाचा परिणाम होऊन दुसऱ्या दिवशी त्यांनी एक प्रस्ताव मांडला. आम्ही दोघांनी आपलं स्वतंत्र बिऱ्हाड थाटायचं. वेगळे झालो की रोजरोजची भांडणं टळतील आणि सुखाच्या संसाराची नांदी होईल असं म्हणाले ते. किती गोड बोलले त्या दिवशी. मला म्हणाले बॅंकेतून लोन घे. आपण लगेच एक छोटा फ्लॅट विकत घेऊ. नव्यानं सुरुवात करू. मी हे सगळं

ऐकून अगदी मोहरून गेले. आणि बँकेतून लोन घ्यायचं कबूल केलं.

**मामी :** पण असं एकसारखं लोन मिळतं बँकेतून ?

**पद्मिनी :** नाही ना. अवघड गेलं. पण मला ही सुवर्णसंधी होती. ती मी हातची दवडणार नव्हते. आमच्या बँकेचे मॅनेजर फार भले गृहस्थ आहेत. कारखानीस.

**मामी :** आता आले होते—

**पद्मिनी :** तेच. त्यांना माझ्याबद्दल खूप सहानुभूती होती. आहे.

**मामी :** सांभाळून.

**पद्मिनी :** त्यांनी खटपट करून मला तीस हजार रुपयांचं कर्ज मिळवून दिलं... कधी नव्हे ते नवरोजींनी धावपळ केली आणि या रकमेत थोडी भर घातली. खटपटी, लटपटी करून आम्ही मालाडला एक २५० स्केअर फुटाचं लहानसं पण हक्काचं खुराडं विकत घेतलं. आम्ही या नव्या जागेत राहायला गेलो आणि—आणि—

**रिबेका :** पाटोपाठ त्यानं त्याच्या गर्लफ्रेंडला आणलं.

**पद्मिनी :** तुला—कसं कळलं ?

**मामी :** भोळी रे भोळी. या वीस वर्षांच्या पोरीला कळलं ते तुला कळू नये ? एरवी छळणारा, दुर्लक्ष करणारा नवरा एकदम कसा ग पाघळतो ? तू लोन घ्यावंस म्हणून तो तुझ्याभोवतो गोंडा घोळतो. आणि तू खुळ्यासारखी त्याच्या भुलथापांवर विश्वास ठेवतेस आणि आपल्या हातांनी त्या बयेचा संसार थाटून देतेस ?

[ पद्मिनी दुःखावेगानं पलंगावर पडून रडू लागते. रिबेका तिच्याजवळ बसून तिला शांत करू पाहते. ]

**मामी :** रडू दे तिला. हलकं वाटेल रडून. काय परमेश्वराची लीला पाहा. बाईला भरपूर अश्रू दिले, आणि ते ढाळायला वारंवार संधी मिळेल अशीही तजवीज करून ठेवली. किती काळजी आहे त्याला...रडू दे. पुढे आपोआप आटून जातील आसवं. माझी गेली तशी. मी काय कमी रडले ? बारा वर्षं संततधारा चालू असायच्या—

**रिबेका :** बारा वर्षांचा जाम सस्पेन्स आहे हं मामी. कुठे होता तुम्ही बारा वर्षं ?

**मामी :** मी ? बारा वर्षं मी मेंटल हॉस्पिटलमधे होते. वेड्यांच्या इस्पितळात. एक पेशंट.

[ मामी वर न पाहता लेसचे विणकाम चालू ठेवते. पद्मिनी आणि रिबेका चकित होऊन तिच्याकडे पाहात राहतात. फोन वाजतो. आतून सेवा दालनात येते. फोन उचलते ].

**सेवा :** हॅलो, येस दॅट्स राइट...कोण ? हो आहे. बोलावते. आपण कोण ?...[ सेवा आत येते ] रिबेका तुला फोन आहे. [ रिबेका घाबरून उठते ].

**रिबेका :** कोण ? कोण आहे ?

**सेवा :** कुणी गोवर्धन म्हणून आहे.

**रिबेका :** [ भेदरून ] नाही. प्लीज–मी मी इथे नाही म्हणून सांगा.

**सेवा :** पण मी तर आताच—

**रिबेका :** प्लीज, प्लीज, आंटी नो नो. मला नाही बोलायचं त्याच्याशी. ही–हीज ईव्हिल...[ नकळत पद्मिनीचा दंड धरते. सेवा परत फोन घेते. ]

**सेवा :** हॅलो. हॅलो...लुक शी इज बिजि...दॅट्स नॉट माय प्राब्लेम. यापुढे इथे फोन नका करू...हाऊ डेअर यू. कुणाला धमक्या देता तुम्ही ? हू यू नो—फोन ठेवला त्यानं...त्याला कसा नंबर माहीत इथला ? तू इथे आहेस हे त्याला कसं कळलं ?

**रिबेका :** मी कुठेही गेले तरी तो मला शोधून काढतो...मला फॉलो करतो...मी कुठेही गेले तरी माझ्या मागावर असतो. ही वोंट लीव्ह मी.

**सेवा :** हे बघ. घाबरू नकोस. इथे सुरक्षित आहेस तू. आता इथे राहायला आलीस ना ? तुझ्या केसाला धक्का नाही लावू शकणार कुणी...तू आजच जाऊन तुझं सगळं सामान घेऊन ये...

**रिबेका :** नाही. मी नाही जाणार...आज नाही जाणार एकटी.

**सेवा :** असं काय रिबेका ? असं घाबरून कसं चालेल...

**पद्मिनी :** केव्हातरी सामान तर आणायलाच लागेल न तुला ?

**रिबेका :** हो, पण एकटी नाही जाणार मी. राहू दे सामान.

**सेवा :** बरं हे बघ, मी गंगारामला देईन तुझ्या सोबत. मग तर झालं ? तो बाजारातून आला की जा तुम्ही.

[ आत जाऊ लागते. दारात थबकून ]

आणि लक्षात ठेवा. तुम्ही इथे आपल्या घरी आहात असं समजा. कुणाची हिम्मत नाही व्हायची तुम्हाला काही करायची रिलॅक्स—

[ आत जाते. तिघीजणी आपापल्या पलंगावर निश्चल. काळोख. ]

# अंक पहिला

## प्रवेश दुसरा

[ रात्र झालेली. खोलीमधे रिबेकाच्या दोन तीन शानदार मोठ्या सूटकेसेस दिसतात. एकटी सेवा खोलीमधे आहे. ती खिडक्यांचे पडदे सारते. कपाट बंद करते. एक सूटकेस रिबेकाच्या पलंगाखाली सारते. दुरून फिल्मी संगीत ऐकू येते.
पाण्याचा लोटा घेऊन पद्मिनी येते. तिने कफ्तान घातलेला आहे. ]

**सेवा :** ठेव इथे. म्हणजे तिघींना घ्यायला सोपं जाईल....पांघरुणं पुरेशी आहेत न तुमच्याकडे ? पहाटे गार वारं सुटतं.

**पद्मिनी :** सगळं व्यवस्थित आहे सेवाताई. तुम्ही आमची एवढी काळजी घेऊ नका. सवय नाही आम्हाला. जड वाटतं.
[ दोघी एकमेकींकडे पाहून हसतात. ]

**सेवा :** हे पाहा काही लागलं तर सांगायचं. संकोच करायचा नाही. जमण्यासारखं नसेल तर मीही संकोच न करता तसं सांगेन...मामी काय करताहेत ?

**मामी :** कॉफीऽ
[ ट्रेमध्ये कॉफी घेऊन मामी आलेल्या. ]
ती कोण ती आक्का कुठाय ?

**पद्मिनी :** रिबेका कपडे बदलतीय.

**मामी :** बराच मोठा संसार दिसतोय तिचा. तीन-चार पेट्या ?

**सेवा :** ती मॉडेल आहे मामी. शिवाय ॲड फिल्मस्, टी. व्ही. सीरिअल करते. तिला तीन पेट्या नकोत ?

**पद्मिनी :** माझ्यासारखी बँकेत कारकून असती तर एका पेटीवर भागलं असतं.

**मामी :** आणि माझ्यासारखी उठणटवळी असती तर एका वळकटीवर. अगं एऽ—अं—अक्काऽऽ—कॉफी निवाली.
[ रिबेका मोरीमधून तोंडाला क्रीम लावत बाहेर येते. तिने नाइटी घातली आहे. ]

**रिबेका :** ओ वाऊ, कॉफी ? हाऊ नाइस...ओ, दूध घातलं ?

**मामी :** म्हंजे काय ? कॉफीत दूध नाही घालायचं ?

**रिबेका :** मी दूध साखर काहीच नाही घेत कॉफीत. ब्लॅक कॉफी.

**मामी :** उद्यापासून तुझ्या आवडीची तू कर...आजच्या दिवस माझ्या आवडीची पी.

वेलदोडा, जायफळ भक्कम घातलंय—एकदम कोजागिरी.

[ बायका कॉफी पितात. रेडिओवरून जोरात गाणे चालू आहे. ]

स् काय हे ? सकाळ-संध्याकाळ बॅंडबाजा चालू असतो. कानीकपाळी एकसारखी तीच ती गाणी—

**पद्मिनी :** निसर्गाचा आवाज तर पार गळा दाबून बंद करून टाकलाय माणसानं हल्ली. कुठे गेले ते पक्षी, तो वारा, लाटा, पानांची सळसळ—

**सेवा :** पानांची सळसळ ऐकू यायला झाडं उरली आहेत कुठे हल्ली ? आता आहेत फक्त यंत्रं...सकाळ-संध्याकाळ अष्टौप्रहर टाहो फोडून रडणारा रेडिओ, अन् टी. व्ही.

**मामी :** अहो सण कुठला हे देखील हल्ली छायागीतवरून कळतं. पूर्वी भक्तिगीत, आरत्या आणि बायकांच्या गाण्यांवरून सणांची चाहूल लागत असे...भोंडल्याची गाणी हल्ली ऐकलीयत कुणी ?

**रिबेका :** कशाची गाणी ?

**मामी :** भोंडल्याची ग.

**सेवा :** ती मिशनमधे वाढलेली मुलगी. तिला काय ठाऊक भोंडला ?

**रिबेका :** मला ऐकायचंय भोंडल्याचं गाणं. दाखवा न म्हणून.

[ थोडे आढेवेढे घेऊन मामी गाऊ लागतात. ]

**मामी :** ऐलोमा पैलोमा गणेश देवा, माझा खेळ मांडून दे—पण माझा खेळ कधी मांडलाच नाही. मांडायच्या आधीच उधळून लावला.

[ वातावरण एकदम गंभीर होतं. कॉफीचे रिकामे कप घेऊन मामी आत जाते. ]

**सेवा :** हे पाहा, तुम्हा दोघींना एक सांगून ठेवते...मामीला जुना इतिहास काढून देऊ नका...जुन्या आठवणी चाळवल्या की ती डिस्टर्ब होते विलक्षण. यू नो शी वॉझ अ मेंटल पेशंट...तेव्हा...अच्छा, झोपा आता. गुडनाइट.

[ जाते. पद्मिनी कॉंटॅक्ट लेन्सेस काढायच्या उद्योगाला लागते. रिबेका प्रसाधन सुरू करते. मामी परत येते. ती आता प्रक्षुब्ध, बावरलेली. ]

**मामी :** [ स्वतःशीच ] लांडगे, लांडगे ग सगळे इथूनतिथून. हिंस्र श्वापदं. टपून बसलेली. एकदम मारून पण नाही टाकणार. लचके लचके तोडून तुमचा खेळ करणार.

**पद्मिनी :** [ उसन्या खेळकरपणाने ] चलाऽऽ झोपा आता. साडे दहा वाजून गेले. उद्या लवकर उठायचंय. पुन्हा रहाटगाडा सुरू. लेजर, फाइली, इन्व्हाइस, अर्ज.

**रिबेका :** मला तर नऊला फोटो सेशन आहे. एका सॉफ्ट ड्रिंकची कॅंपेन आहे.

**मामी :** ( स्वतःशी ) लांडगे—गिधाडं—

[ संभाषणाचा ओघ बदलण्याचा पद्मिनी आणि रिबेकाचा आटोकाट प्रयत्न. ]

**पद्मिनी :** काय करणार आहात ग कॅंपेन म्हणजे ?

**रिवेका** : आमचं सॉफ्ट ड्रिंक शाळा-कॉलेजच्या मुलामुलींच्यात पॉप्युलर आहे असं दाखवणार आहोत आम्ही. उद्या शाळेच्या पण मुली येणार आहेत. बारा-तेरा वर्षांच्या.—बर का मामी.

**मामी** : बारा-तेरा वर्षांच्या लहान मुली. किती सुंदर वय. नाही? कळ्या नुकत्याच उमलायला लागतात... पण मला नाही हो उमलू दिलं. काही कळायच्या आतच कोमेजून गेले मी. अवघी तेरा वर्षांची होते तेव्हा पहिल्या लांडग्यानं झडप घातली माझ्यावर. आणि लांडगा कसा? नात्यातला. सख्खा मामा माझा...त्याच्याकडे आश्रित होतो आम्ही. माझी आई आणि मी. या पापकांडाची माहिती कळल्यावर काय म्हणाली असेल माझी आई? "बाहेर कुठे बोलू नकोस. अब्रू जाईल." मी अवाक् झाले. आता अब्रू काय जायची शिल्लक होती? ती तर गेलीच होती. पण नाही. समाजनीतीचा पहिला धडा गिरवला त्या दिवशी. गोष्ट चव्हाट्यावर आली, चौकानी झाली तरच अब्रू जाते. चार भिंतीआड कड्याकुलपं घातलेल्या बंद दरवाज्याआड काहीही घडलं तरी अब्रू सलामत राहते...आई हातापाया पडली माझ्या. आपलेच दात आणि आपलेच ओठ म्हणाली. मी गप्प राहिले...मामानं पुन्हा बोट लावलं नाही. माझ्या डोळ्यांतल्या निखाऱ्यांना घाबरला...पण एक बकरा गाठून वर्षभरात माझं लगीन लावून दिलं हरामखोरानं.

**पद्मिनी** : मामी...जाऊ देत त्या जुन्या गोष्टी. झोपा आता.

**मामी** : झोपू? अगं जन्माची झोप उडालीय माझी. गोळ्या घेऊन झोपावं लागतं गोळ्या.

[उशीखालून बाटली काढते. रिबेका पाणी ओतून देते. दूर गाणं 'पहिल्या रात्रीचं."]

ऐकलंत? ऐकलंत ना? सुहाग रात्रीचं गाणं...माझ्या सुहाग रात्रीची गंमत ठाऊक आहे का?

**रिबेका** : कमॉन मामी, बी अ गुड गर्ल—

**पद्मिनी** : गोळी घेऊन टाका बघू. आता गप्पा बंद.

**मामी** : का? तुम्हाला नुसतं ऐकायला जड जातंय? आणि मी भोगलं त्याचं काय? आं? त्याचं काय? सांगा. [रागात गोळ्या भिरकावून देतात.]

**पद्मिनी** : ते खरं मामी, पण आता कशाला त्या कडू आठवणी काढता?

**मामी** : काढत नाही मी. आठवणी निघतात. दाबून टाकल्या तर आणिकच उफाळून वर येतात. तुम्हाला त्रास होत असेल तर नाही सांगत मी. पण त्या आतल्या आत घुसमटत राहतात...राहू देत.

[पद्मिनी मामींजवळ येते.]

**पद्मिनी** : काय झालं तुमच्या पहिल्या रात्री?

**मामी** : काही नाही.

**रिबेका** : सांगा न.

**मामी** : खरंच सांगते. काही झालं नाही. जीव मुठीत धरून मी पलंगावर थरथरत बसले होते. माझ्या दृष्टीनं आणखी एक लांडगा येणार होता वसुलीला. तोसुद्धा अनोळखी. नवरा झाला तरी अनोळखीच...दार वाजलं. पतिदेव आले. पलंगावर बसले...म्हणाले, “ वत्सला, घाबरू नकोस. माझ्यापासून तुला काही भीती नाही. कधीच. मी निरुपद्रवी आहे. मी तुझा नावालाच नवरा राहीन. तुझ्या कुंकवाचा धनी. त्या रात्री शांत झोपले मी...शांत झोपेची त्या घरातली तेवढी एकच रात्र. दुसऱ्या दिवशी सासूबाईंनी मायेनं पाठीवरून हात फिरवला आणि म्हणाल्या, “ मुली, तुला काही कमी नाही पडू देणार हो आम्ही. नवऱ्याच्या जागी तू मामंजींची सेवा कर. त्यांना पतीच्या ठिकाणी समज. ”

**पद्मिनी** : काय ? अशक्य ! सासूनं असं सांगितलं ?

**मामी** : माझ्याबरोबर मेंटल हॉस्पिटलमध्ये राहिली असतीस तर याहून सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकल्या असत्यास. एक शब्द खोटा नाही. काय करते सासू माझी ? तिचा नवरा राक्षस होता. स्त्रीदेहासाठी सदा वखवखलेला. निरनिराळ्या क्लृप्त्या करून त्याच्यासाठी बायका मिळवत असत सासूबाई. कामाच्या बाया, मोलकरणी. आता तर मी हक्काची सून आले होते घरी...खरोखरच तो निर्लज्ज माणूस रात्री माझ्या खोलीत येऊ लागला. सात दिवस मी सोसलं––आणि मग––

[ अंधार. पुरुषाची आकृती आत येते. ]

**मामी** : मामंजी पुढे येऊ नका.

**मामंजी** : बाळ, जागी आहेस वाटतं आज ? रोज झोपेचं नाटक करतेस. अं ?...

**मामी** : पुढे येऊ नका. तिथेच थांबा—मी ओरडून गाव गोळा करीन.

[ तरी मंद हसत पुरुष तिच्याकडे सरकतो. तिचा हात झेपावतो. हातातला सुरा लखकन चमकतो. तो पलंगावर बसतो. ती झपाटल्याप्रमाणे वार करते. ]

मेल्या, लांडग्या, घे, घे.

[ तो किंचाळतो. ती हसत सुटते. उजेड पूर्ववत उजळतो. बेभान झालेल्या मामी कात्रीनं उशीवर पुन्हा पुन्हा वार करीत आहेत. जोडीला पिसाट हसणे चालू. पद्मिनी, रिबेका भयभीत बाजूला उभ्या. सेवा धावत येते. ]

**सेवा** : मामी, मामी, काय चाललंय हे ?

[ तिला सावरतात. बिचकत बाचकत पद्मिनी आणि रिबेका मदत करतात. मामी शांत होते. सेवा तिच्या हातातली कात्री अलगद काढून घेते. ]

छान. चांगला तमाशा दाखवलात रूम पार्टनर्सना पहिल्याच दिवशी...तुम्हाला परत तिकडेच जायचं आहे का ? वनवासाची हौस संपलेली दिसत नाही बारा वर्षांनंतरही.

**मामी** : नाही, नाही. नको सेवाताई...खरंच नको. मी रेडिओवर ते गाणं ऐकलं...

आणि...आणि माझा तोल गेला...मला वाटतं मला खिजवण्यासाठीच लावतात अशी गाणी.

**सेवा** : दर वेळेला रेडिओवर गाणं लागलं की तुम्ही अशा बिथरणार असाल तर कठीण आहे. खरोखरच तुम्हाला मोकळं ठेवणं बरोबर नाही.

**मामी** : चुकले, चुकले सेवाताई. रागवू नकोस. मी झोपून जाते—गोळी कुठाय ?

**सेवा** : अजून घेतली नाही ?

**मामी** : नाही. मघाशी घेत होते. पडली कुठेतरी हातातून.

[ मामी गोळी घेऊन आडव्या होतात. भिंतीकडे तोंड करून निमूट पडून राहतात ]

**सेवा** : [ त्या दोघींना ] तुम्ही घाबरला असाल. आयम् सॉरी. साहजिक आहे...पण त्यांना जुन्या आठवणी काढू देऊ नका म्हणून बजावलं होतं मी तुम्हाला. एनीवे तशा त्या खरोखर हार्मलेस आहेत...शिवाय गोळी घेतलीय त्यांनी. तेव्हा शांत झोपतील. पण तुम्हाला जर भीती वाटत असेल तर त्यांना मी माझ्या खोलीत झोपायला नेऊ का ?

**पद्मिनी** : माझी हरकत नाही त्यांनी इथे झोपायला.

[ रिबेकाकडे पाहते. ]

**रिबेका** : आय डोंट माइंड. प्लीज ओके. पुअर थिंग.

**पद्मिनी** : पण हे असं वरचेवर—

**सेवा** : आज सहा महिने आहेत त्या इथे. ही तिसरी खेप.

**पद्मिनी** : काय करतात ?

**सेवा** : हे असंच. आरडाओरडा आणि उशीवर हल्ला—

[ त्यांच्या हातात फाटलेली उशी आहे. ]

उशीवर राग काढतात त्या. चला. आता मात्र झोपा. गुडनाइट.

[ सेवाताई जातात. रिबेका एक मोठे टेडिबेअर काढते. वॉकमन काढून कानाला हेडफोन लावते. ]

**रिबेका** : गाणी ऐकत ऐकत झोपून जाते मी. आय शट द वर्ल्ड आउट.

**पद्मिनी** : मी दहा मिनिटं वाचलं तर तुझी हरकत नाही ना ? चार पानं तरी वाचल्याशिवाय झोप येत नाही मला...लग्नानतर सवय लागली, झोपताना वाचायची. मधला लाइट बंद करू. टेबललॅंप तेवढा ठेवते.

**रिबेका** : खुशाल वाच. मी आता कानाला हेडफोन लावले की बाहेरच्या दुनियेशी संबंध नाही. गुडनाइट.

[ रिबेका कानाला हेडफोन लावून झोपते. ]

**पद्मिनी** : गुडनाइट रिबेका.

**मामी** : ( एकदम उठून ) गुडनाइट पद्मिनी...ए अक्का ग. गुडनाइट.

**पद्मिनी :** तिनं कानाला ढापणं लावलीयत. तिला नाही ऐकू येणार काही.
[ पद्मिनी टेबललँप लावते. मोठा दिवा मालवते ].
( फोन खणखणतो ) आता या वेळेला—?

**मामी :** रॉंग नंबर असेल. वाजू दे. होईल बंद—
[ फोन वाजत राहतो. पद्मिनी दालनात जाऊन तो घेते. ]

**पद्मिनी :** हॅलो–हॅलो–कोण ? सॉरी. ती झोपली आहे. नो आय विल नॉट वेक हर अप...पुन्हा इथे फोन करू नका—[ ठेवते. परत येते ] तोच तो. गोवर्धन. मला घाणेरड्या शिव्या दिल्या.

**मामी :** त्याला देऊ दे घाणेरड्या शिव्या. तू घेऊ नको.
[ भिंतीकडे वळते. अकराचे टोल वाजू लागतात. पद्मिनी वाकून रिबेकाकडे पाहते. ती झोपलेली. ]

**रिबेका :** ( झोपेत ) माइक...मायकल...

**पद्मिनी :** झोपेत बोलत्येय वाटतं ही ?

**रिबेका :** मायकल...डोंट टेक हिम अवे––

**पद्मिनी :** किती अवघडून झोपलीय ही. कुशीत ते एवढं मोठं अस्वल––
[ ती अस्वल काढून घेऊ लागते. रिबेकाची झोप चाळवते. ती दचकून किंचाळू लागते. ]

**रिबेका :** नो—नो—डोंट टेक हिम अवे. मायकल. माईक—
[ पद्मिनी झटकन उठून दिवा लावते. रिबेका भयभीत उठून बसलेली. पद्मिनीला बिलगते. ]
ते घेऊन जाताहेत. घेऊन जाताहेत मायकलला.

**पद्मिनी :** शांत हो रिबेका. क्वाएट...शांत हो...तुला स्वप्न पडलं...कोण कुणाला घेऊन जात होतं ?

**रिबेका :** मायकलला—

**पद्मिनी :** कोण मायकल ?

**रिबेका :** मायकल...माइक....मुलगा माझा. माय लिटल बेबी—
[ मामी, पद्मिनी चकित. निश्चल. टेडी बेअरला कवटाळून रिबेका उद्ध्वस्त अशी. संगीत. काळोख. पडदा ]

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ संध्याकाळ. दोन-तीन दिवस उलटले आहेत. खोलीमध्ये फक्त सेवा आहे. ती काही कामात गुंतली आहे. आतून हात पुशीत मामी बाहेर येतात. ]

म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
वा. क्र. २१८६५ २८।३।८८
वि. ... नाटक

**मामी :** खाणार ? गरमागरम वडे ?

**सेवा :** नाही. नको. त्या दोघी आल्या म्हणजे बरोबरच खाऊ या...तुम्ही लाडावून ठेवणार आहात तुमच्या पार्टनर्सना...रोजची प्रथा पडेल.

**मामी :** बिघडलं कुठे ? माझा वेळ जाईल. मला दोन पैसे मिळतील हातखर्चाला. त्यातला एक तुम्हाला. सगळ्यांची सोय होईल. मी तर रात्रीचा स्वयंपाकही सुरू करावा म्हणते.

**सेवा :** ते मात्र कठीण जाईल हं. जेवणाच्या बाबतीत आपल्याकडे नॅशनल इंटिग्रेशन नाही. चौघींच्या चार तऱ्हा आहेत. डबा आहे तोच बरा आहे. त्यातनं गंगाराम गावी जायला निघाला आहे.

[ घंटा. सेवा बाहेर दालनात येते. दार उघडते. रिबेका आत येते. तिच्या बरोबर एक स्मार्ट तरुण आहे. ]

**रिबेका :** सेवाताई मीट टोनी. टोनी फोटोग्राफर आहे. या सेवाताई. शीज द बॉस.

[ नमस्कार चमत्कार. सेवा आत जाते. ]

तू बस इथे. या—या रेषेच्या पुढे जायचं नाही हं. स्ट्रिक्टली आउट ऑफ बाउंड्स. मी वॉश घेऊन येते. तू मासिक पाहा. चिक्कार मासिकं आहेत तिथे.

[ तो तसाच बसतो. रिबेका खोलीत येते. ].

ओ मामी. गुड न्यूज. दोन टेबलक्लॉथच्या ऑर्डरी आहेत. आठ बाय आठच्या.

**मामी :** अगबाई हो का ? कधीला हवेत करून ?

**रिबेका :** अं...एका आठवड्यात होतील ?

**मामी :** हो. उद्यापासून लागेन विणायला. वा, वा! अग पोरी, तुला कमिशन काय देऊ ?

**रिबेका :** चहा.

**मामी :** हात्तेरी. अगं वडे पण केलेत साबुदाण्याचे. आणते वडे आणि चहा.

**रिबेका :** मामी, चहा दोन कप हं प्लीज. बाहेर पाहुणा बसला आहे माझा.

**मामी :** पा हु—णा ?

**रिबेका :** हो. बुवाऽ.

( वेडावून मामीच्या अंगावर धावून जाते )

**मामी :** चल चावट.

**रिबेका :** मामी साखर कमी हं. थँक्यू—

[ मामीला फ्लाइंग किस फेकते. मामी लटक्या रागाने पण खूष होऊन आत जातात. रिबेका टॉवेल घेऊन मोरीत जाते. टोनी बाहेर सिगरेट पेटवतो. फोन वाजतो. थोडी वाट पाहून, कुणी येत नाही असे पाहून टोनी फोन उचलतो. ]

**टोनी** : हॅलो. दॅटस राइट...हां, है. शीज हॅविंग अ वॉश...क्या ? ...आप कौन हैं...हू द हेल आर यू ? लुक हिअर. तुम–ठेवला फोन. हरामखोर. ब्लडी इडियट. बास्टर्ड—ओ सॉरी.

[ याच क्षणाला पद्मिनी बाहेरून आत आलेली. ती टोनीकडे कटाक्ष टाकून खोलीत येते. सामान ठेवते. मोरीपर्यंत जाते. ]

**पद्मिनी** : रिबेकाऽ

**रिबेका** : ( आतून ) दोन मिनिट.

[ पद्मिनी पलंगावर बसते. पर्समधून कागद काढून पाहते. स्वतःशी हसते. बाहेर दालनात मामी दोन कप चहा घेऊन आलेल्या. एक कप झाकून ठेवतात. टोनी तसाच बसून आहे. ]

**मामी** : [ दटावून ] चहा घ्या ! थंड होईल.

[ टोनी झटकन कप उचलतो. चहा पितो. तोंड वाईट करतो. साखर कमी आहे. मामी खोलीत येतात. ]

**मामी** : अग पद्मिनी. तू कधी आलीस ? थांब, तुझा चहा टाकते.

**पद्मिनी** : नाही, नाही. नको. घेऊन आले मी आताच.

**मामी** : लोकलमधे ?

**पद्मिनी** : लोकलमधे नाही. कोपऱ्यावरच्या इराण्याकडे.

**मामी** : कारखानीसांच्याबरोबर ?

[ पद्मिनी मामींकडे थंड कटाक्ष टाकते. ]

बरं. गरम साबुदाणा वडा तरी खा. आताच केलेत मी... ( हळू आवाजात ) बाहेर नाही हो दिले मी. नुसताच चहा दिला रिबेकाच्या पाहुण्याला. त्याला कशाला उगीच वडा ?

[ मामी आत जातात. रिबेका मोरीतून बाहेर येते. ]

**रिबेका** : आले की नई दोन मिनटांत ?

**पद्मिनी** : थँक्यूऽ ऽ

[ पद्मिनी मोरीत जाते. रिबेका दालनात जाते. चहा पिते. ]

**रिबेका** : अरे हो. तुझ्या चहात साखर बरोबर होती ना ?

**टोनी** : नव्हती. कमी होती.

**रिबेका** : अरे मग मागायची नाहीस का ? वेडा.

**टोनी** : मी–अं–घाबरलो त्या बाईला.

**रिबेका :** ओ प्लीज व्हेरी स्वीट.

**टोनी :** हो खरंच, तुला एक निनावी फोन आला होता घाणेरडा.

[ रिबेकाच्या हातातला कप डळमळतो. चहा सांडतो. ]

कोण आहे हा माणूस ? त्याला तुझा फोन नंबर कसा मिळाला ?

**रिबेका :** मला नाही ठाऊक. मी कुठेही गेले तरी तो मला शोधून काढतो.

**टोनी :** रिबेका, यू नीड प्रोटेक्शन. तुझी काळजी घेणारं कुणीतरी हवंय तुला.

**रिबेका :** तू आहेस ना टोनी.

**टोनी :** मी काय तुला प्रोटेक्ट करणार ? मलाच तू दोन-तीन दिवसांतून एखाददा भेटतेस. ते सुद्धा आपलं फोटो सेशन असलं म्हणजे. लेट मी लुक आफ्टर यू रिबेका. जिवापलीकडे काळजी घेईन तुझी. ऑफिशिअली. हक्कानं. . .तुझ्या हक्काचा बॉडी-गार्ड. तू फक्त हो म्हण. . .तुला माहीत आहे रिबेका—मी—मला—आय लव्ह यू रिबेका. आय वॉंट टु मॅरी यू—

[ मामी कप न्यायला आलेल्या. या दोघांचे त्यांच्याकडे लक्ष नाही. ]

माझ्याशी लग्न कर.

[दोघांचे आता मामींकडे लक्ष जाते. क्षणभर अवघडलेली शांतता. मामी कप नेतात.]

बोल ना.

**रिबेका :** काय बोलू ?

**टोनी :** उत्तर दे. हो म्हण.

**रिबेका :** टोनी, पुन्हा पुन्हा तोच विषय का काढतोस ? किती वेळा सांगितलं ? मला तुझ्याशी लग्न करायचं नाही.

**टोनी :** पण का ? माझ्याशी लग्न का करायचं नाही ?

**रिबेका :** लग्नच करायचं नाही मला. कळलं नाही तुला अजून ? का मला पुन्हा पुन्हा विचारतोस ?

**टोनी :** कारण एक न एक दिवस तुझं उत्तर बदलेल याची खात्री आहे मला. . .ओ.के. चलतो मी. थॅंक्स फॉर द टी . . ॲंड सिंपथी.

[ तो जातो. रिबेका खोलीत येते. आपल्याच विचारात हरवलेली. आतून वडे घेऊन मामी येते. ]

**मामी :** ( स्टेशनप्रमाणे ) वडा ·एऽ वडाऽ. गरमागरम वडा एऽऽ.

[ मोरीतून पद्मिनी बाहेर येते. ती गाणे गुणगुणते आहे. ]

वा ! खुषीत दिसतेस. काही विशेष ?

**पद्मिनी :** हो विशेषच. माझे डिवोर्सचे पेपर सबमिट झाले आज. आमचा वकील फारच जोरात आहे. एकदम कॉनफिडंट. वीस तारखेला सुनावणी आहे. त्याला खूप होप्स आहेत.

**मामी** : आणि तुझ्या जागेचं काय ? तुझा फ्लॅट तुला परत मिळेल ?

**पद्मिनी** : त्याची पण खटपट चालू आहे. हा लढा मी शेवटपर्यंत लढणार. पाहू... अरे, रिबेकाला काय झालं ? ही सदाफुली का अशी कोमेजलीय आज ?

**मामी** : सरळ हिशेब आहे. तुला डिवोर्स मिळणार म्हणून तू खुषीत आहेस. तिला लग्नाची मागणी आली म्हणून ती चेहरा पाडून बसली आहे.

**पद्मिनी** : आं ? लग्नाची मागणी ?

**मामी** : हो, आताच ऐकलं मी...चुकून कानावर पडलं हो. मोठ्या मोठ्यानं बोलत होती दोघं

**पद्मिनी** : ए रिबेका, वडा घे बाई. अग, तू या खोलीची जान. तुला असं उदास बसून कसं चालेल ?

[ रिबेका एकदम स्वतःला सावरते. ]

**रिबेका** : उदास ? कौन है उदास. क्यों टेडी ? अरे उदास होंगे अपने दुष्मन...मम् मस्त वडे यार. मामी द ग्रेट...और नहीं है ? आणि सेकंड राउंड ऑफ टी, वड्याबरोबर ? कोण घेणार ? मी बनवते.

**पद्मिनी** : बरं चल. अर्धा हं पण.

**मामी** : मी पण अर्धा. आयता मिळतोय म्हणून हो केवळ.

[ रिबेका आत जाऊ लागते. मामी ओरडून ]

साखर भक्कम घाल...[ रिबेका जाते ] मघाशी तिच्या पाहुण्याला सुद्धा मी कमी साखरेचा चहा दिला. प्यायला बिचारा.

**पद्मिनी** : कमी साखरेचा चहा पिऊनसुद्धा मागणी घातलीन ना ?

**मामी** : हो, अगदी लट्टू दिसला पोरीवर.

**पद्मिनी** : ती काय म्हणाली ?

**मामी** : 'नाही' म्हणाली...गेला बिचारा चेहरा पाडून...पण मला विचारशील, तर तिलासुद्धा तो आवडतो. असं आपलं वाटतं हो मला. बरा वाटला ग इसम. म्हणजे, पुरुष आहे त्या मानानं.

**पद्मिनी** : तुमचं सर्टिफिकेट मिळालं म्हणजे विशेषच असला पाहिजे.

**मामी** : बिनासाखरेचा चहा नाही का निमूटपणे प्यायला...म्हणा, लग्न झाल्यावर दाखवील नवरेपणाचा इंगा.

**पद्मिनी** : तुम्ही सगळेच नवरे वाईट ठरवून टाकले मामी.

**मामी** : तुझा नव्हता ?

**पद्मिनी** : होता. आहे. पण म्हणून सगळेच पुरुष निकालात नाही काढत मी. खूपसे चांगले पुरुषसुद्धा आहेत जगात.

**मामी** : कुठे असतील ते असोत बापडे. माझ्या पाहण्यात नाही कुठे आले ते. तुझ्या

पाहण्यात आले असले तर ठाऊक नाही.

**पद्मिनी :** ( अर्धवट स्वतःशी ) हो. माझ्या पाहण्यात आला आहे एक असा पुरुष. नडल्यापडल्याला साहाय्य करणारा. खिशाला खोट सोसून गरजवंताला मदत करणारा. सतरा वर्षं अंथरुणाला खिळलेल्या बायकोची सेवा करणारा. तिला जाता येत नाही म्हणून नाटक, सिनेमा, लग्नसमारंभ, वर्ज्य करणारा एक माणूस पाहिला आहे मी.

**मामी :** मोजका एखादा अपवाद असेल कुणी. नेमका तो तुझ्या पाहण्यात आला.

**पद्मिनी :** मामी—येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, महावीर, सम्राट अशोक, शिवाजी, विवेकानंद, महात्मा गांधी, टिळक, आगरकर, जोतिबा फुले, महर्षी कर्वे...हेही पुरुषच होते.

**मामी :** नाही. ते " सत्पुरुष " होते. तू साध्या पुरुषांचं बोल.

**पद्मिनी :** घरातल्या घरात पाहा न, प्रत्येक कुटुंबात पुरुष असतातच की. बाप, भाऊ, काका—

**मामी :** मामा ! ! तू मला नातलगांचं सांगू नकोस. कितीही रदबदली केलीस तरी सत्य लपून राहणार नाही. पुरुष म्हणजे सैतानाचे वारस आणि लग्न म्हणजे अग्निदिव्य.

**पद्मिनी :** आणि एवढं असून मामी, रिबेकानं आपल्या मित्राला नकार दिला म्हणून चक्क हळहळलात तुम्ही. खरं की नाही ? [ मामी गप्प. निरुत्तर ] आता का गप्प बसलात ? सांगा की. का हळहळलात ?

**मामी :** सांगू ? अगं मारुतीच्या बेंबीसारखं झालं असेल माझं. एका ब्राह्मणाच्या बोटाला विंचू नाही का चावला मारुतीच्या बेंबीत ? तेव्हा तो म्हणाला, " अहाहा, मारुतीरायाच्या बेंबीत कसं गाऽर वाटलं. " हेतू हा की बाकीच्यांनाही विंचवाचा प्रसाद मिळावा.

( मिष्किलपणे हसते. )

**पद्मिनी :** काहीतरीच तुमचं मामी—

**मामी :** जुनी लोककथा हो आपली. थोडक्यात काय, की मनुष्यस्वभावाला औषध नाही. अगं मी माणूसच.

**पद्मिनी :** किती गोड मुलगी आहे रिबेका. लग्नाच्या फुफाट्यात न पडताच होरपळून निघालीय बिचारी.

**मामी :** हो ग हो. मी मेली उगीच बोलत असते तोंड आहे म्हणून. पण खरंच, छान दिसेल दोघांचा जोडा. तोसुद्धा तसा दिसायला, बोलायला, चालायला बरा वाटला. तिनं जर मनात घेतलं—

[ चहा वडे घेऊन रिबेका आलेली. तिची चाहूल लागून मामी गप्प होतात. ]

**रिबेका :** माझ्याबद्दल बोलत होतात नं ?

**पद्मिनी :** हो.

**रिबेका :** टोनीबद्दल आणि माझ्याबद्दल

**मामी :** हो.

**रिबेका :** इथे कोणतीच गोष्ट खाजगी राहणार नाही का ? जस्ट नो प्रिवसी इन धिस डॅम प्लेस. सारखी कुजबुज. सारख्या चौकशा.

**मामी :** यापुढे बंद ! तुझा विषय बंद. रिकाम्या चौकशाही बंद.

**पद्मिनी :** रिबेका, चार जिव्हाळ्याच्या लोकांमधे सुख आणि दुःख वाटावं म्हणतात. त्यामुळे सुख द्विगुणित होतं आणि दुःखं हलकं. आता आम्ही जिव्हाळ्याच्या आहोत की नाही, हे तू ठरवायचंस. पण मी नाही का, ओळख झाल्याझाल्याच भडाभडा माझी हकीकत सांगून मोकळी झाले ? मामींनीसुद्धा आडपडदा न ठेवता आपली रामकहाणी ऐकवली ?

**मामी :** आयुष्याचा खेळच मुळी चव्हाट्यावर मांडलेला. आता कशाची प्रायवसी घेऊन बसलीस पोरी ? आणि कुणापासून प्रायवसी ?

**रिबेका :** स्वतःपासून. स्वतःपासून लपून बसायचंय मला. दूर जायचंय स्वतःपासून... ते जमत नाही. वाईट संगत सुटत नाही म्हणतातना ?

**पद्मिनी :** काहीतरीच तुझं रिबेका. वाईट संगत ? तुला 'वाईट' कुणी ठरवलं ?

**रिबेका :** सगळ्यांनी. जन्म देणाऱ्या आईसकट सगळ्यांनी. मर्सी मिशनजवळच्या उकिरड्यावर सापडले मी. कापडात गुंडाळून फेकून दिलेलं एक बेवारसी बंडल. मिशनच्या सिस्टरना सापडले मी. केळीच्या सालींमधून आणि अंड्याच्या टरफलातून त्यांनी मला उपसून बाहेर काढलं.

**पद्मिनी :** उपसून बाहेर काढलं ना ? हे महत्त्वाचं. तू वाईट असतीस तर कशाला कुणी बाहेर काढलं असतं ?

**मामी :** केळ्याच्या साली आणि अंड्याची टरफलं नाही कुणी वेचली ती ? अगं चिखलामधे कमळं रूजतात हे ठाऊक आहे ना तुला ?

**रिबेका :** चिखलामधे कमळं ? हाऊ रोमॅंटिक. मामी, तुम्ही वकील व्हायला हवं होतं.

**मामी :** खरं ग पोरी. जेमतेम नववीचा टिळा लावून घेतला मी. मुली आणि शिक्षण हे समीकरण आमच्याकडे पटण्यासारखं किंवा परवडण्यासारखं नव्हतं बघ, नाहीतर वकीलच व्हायची मी.

**पद्मिनी :** तू मिशनमधेच शिकलीस ? तिथेच वाढलीस ?

**रिबेका :** हो. कॉनवेंटमधे शिकले आणि मिशनच्या अनाथाश्रमात वाढले.

**मामी :** च् च्.

**रिबेका :** आं हां. तसं मजेत गेलं माझं बालपण.

**पद्मिनी :** सदाफुली कुठेही फुलते. कोणत्याही कोपऱ्यामधे बापडी प्रसन्न उभी असते.

**रिबेका :** तशा मायाळू होत्या बहुतेक सगळ्या सिस्टर्स. सिस्टर मिरियम म्हणायच्या "आकाशातला बाप आपल्या सगळयांचा बाप आहे." तेव्हा वाटायचं, ते खरं. सगळ्यांचा बाप तर झाला, पण आपल्या स्वतःचा एक स्वतंत्र बाप असता, आई असती, तर किती बरं झालं असतं.

**मामी :** खरं ग बाई. त्या जोगिणींना कशी सर येणार सख्ख्या आईवडिलांची ?

**रिबेका :** सिस्टर मिरियम आपल्याकडून खूप करायच्या. जीव लावायच्या आम्हा अनाथ पोरींना. कविता शिकवायच्या, गोष्टी सांगायच्या, वेण्या घालायच्या, उवासुद्धा काढायच्या...तसं खूप स्ट्रिक्ट होतं वातावरण, कॉन्व्हेंटमधलं. एवढे एवढे लांब झगे घालायला लागायचे. पोटऱ्या दिसू नयेत म्हणून. अभ्यासपण खूप करायला लागायचा. शाळेत चांगला अभ्यास होता माझा. विशेष तर इंग्रजी, हिंदी आणि मराठीमध्ये पहिला नंबर कायम. शिवाय वक्तृत्व आणि नाटक. नाटकात माझा मेन रोल अगदी ठरलेला असायचा.

**मामी :** नवल नाही. तुझ्या अभिनयकौशल्याची झलक पाहिली न.

**रिबेका :** या नाटकापायीच सगळा घोटाळा झाला. स्टेजवर मिरवायची हौस भोवली शेवटी.

**पद्मिनी :** काय झालं ? शाळेत काही गडबड झाली ?

**रिबेका :** नाही. शाळा व्यवस्थित पार पडली. गडबड झाली ती पुढे.

**पद्मिनी :** कॉलेजात ?

**रिबेका :** कॉलेजात गेलेच नाही मी. पॉलिटेक्निकला गेले. मला इंटीरिअर डेकोरेटर व्हायची खूप हौस होती. छान कोर्स होता आमचा. शिवाय खूपशा एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिविटीज. आमच्या वार्षिक दिनासाठी खूप जोरात नाटक बसवलं होतं आम्ही. मी त्यात एंजल ऑफ पीस झाले होते. शांतिदेवता. प्रयोग इतका छान झाला की टी. व्ही. वर आमचा प्रोग्रॅम ठरला.

**पद्मिनी :** कोणत्याही कार्यक्रमाची अंतिम सांगता, दूरदर्शन. द अल्टिमेट डेस्टिनेशन-टेलिविजन.

**मामी :** ऐक ग.... टी. व्ही. वर कसं झालं नाटक ?

**रिबेका :** खूप छान झालं. गाजलं अगदी. माझं वरंच कौतुक झालं. सिस्टर्सनी दृष्ट काढायची तेवढी बाकी ठेवली होती. माझं काम पाहून एक इसम माझा शोध घेत पार इन्स्टिट्यूटमध्ये पोहोचला आमच्या.

**मामी :** कोण होता तो ? हं ?

[ तिघींवरचा प्रकाश अचानक मंदावतो. प्रकाशझोत दुसरीकडे प्रखर होतो. फिल्मी थाटाचा एक इसम उभा आहे. गोवर्धन. तो हात जुळवून नमस्कार करतो. ]

**गोवर्धन :** गोवर्धन. गोवर्धन प्रकाश. मी एका ॲड एजन्सीचा रेप्रझेंटटिव्ह आहे. तुम्ही रिबेका ? रिबेका जोसेफ ?

[ रिबेका विचकत त्याच्यासमोर येऊन उभी राहिलेली. ]
कॉंग्रॅचुलेशन्स. तुम्हाला टी. व्ही. वर पाहिलं. यू वेअर ग्रेट. सिंपली ग्रेट.
[ शेक हॅंड करतो. ]
माझी मॉडेलिंग एजन्सी आहे.

**रिबेका** : मॉडेलिंग एजन्सी ?

**गोवर्धन** : हो, म्हणजे मी मुली पुरवतो—म्हणजे मॉडेल्स सप्लाय करतो. ॲड फिल्मसाठी.
( रिबेका कोरी उभी ) ॲड फिल्म्स ठाऊक आहेत न ? रेग्युलर सिनेमाच्या आधी दाखवतात नाही का थिएटर्समधून ? तर त्या फिल्म्समध्ये काम करायचा चान्स तुम्हाला मिळू शकेल—आय कॅन अरेंज इट. यू विल बी ॲन ॲड फिल्म स्टार.

**रिबेका** : पण—पण मला नाही ॲड फिल्ममध्ये काम करायचं.

**गोवर्धन** : आं ? ओ—आय सी. ॲंबिशस आहेस तर ? गुड. गुड. एकदम मोठ्या फिल्ममध्ये चमकायचं आहे ? स्ट्रेट अ हिरॉइन इन अ हिंदी फिल्म. क्यों ? तेही जमेल. नॉट डिफिकल्ट.

**रिबेका** : नाही, नाही. मला हिंदी काय किंवा मराठी काय, कुठल्याच फिल्ममध्ये काम नाही करायचं.

**गोवर्धन** : असं कसं शक्य आहे ? प्रत्येक सुंदर मुलीला हिरॉइन व्हायचं असतं. त्यातून तुझ्या बाबतीत घरचा विरोध पण संभवत नाही.

**रिबेका** : मला इंटीरिअर डेकोरेटर व्हायचंय. हिरॉइन नाही. नाटकात काम मी गंमत म्हणून करते एवढंच.

**गोवर्धन** : मग गंमत म्हणून ॲड फिल्ममध्ये काम करून पाह्यला काय हरकत आहे ? अं ?

**रिबेका** : नाटक वेगळं आणि फिल्म वेगळी. नाटक संस्थेपुरतंच असतं. थोड्या लोकांसाठी. ॲड फिल्म म्हणजे थिएटरमध्ये हजारो लोक पाहणार.

**गोवर्धन** : टी. व्ही. वर तर लाखो लोकांनी पाहिलं तुला. काय ?
( क्षणभर रिबेका निरुत्तर. )

**रिबेका** : ते आपलं असंच...एक अनुभव म्हणून केलं टी. व्ही. मध्ये काम.

**गोवर्धन** : मग हाही एक अनुभव घेऊन पाहा. ... काय हरकत आहे ? अ यंग गर्ल शुड बी बोल्ड. ...टी. व्ही. वर पैसे मिळाले ?

**रिबेका** : हो. इंस्टिट्यूटला पैसे मिळाले. आम्हा प्रत्येकीला पन्नास रुपये मिळाले.

**गोवर्धन** : ( हसतो ) पन्नास रुपये ? तुला इथे एका दिवसाच्या कामासाठी पाचशे रुपये मिळतील. फाइव हंड्रेड.

**रिबेका** : नाही. नको. खरंच—

**गोवर्धन** : परवा शूटिंग आहे. एका चॉकलेट कंपनीसाठी ॲड बनवायची आहे. एक

सुंदर परी–तू–लहान लहान मुलांवर दोन्ही हातांनी चॉकलेटं गोळ्या आणि टॉफ्यांची बरसात करते असा शॉट आहे. हाऊ ब्यूटिफुल, अं? सो इनोसंट. सुंदर कपडे घालून छोट्या छोट्या मुलांच्यात खेळायचं आणि पाचशे रुपये पर्समधे घालून घरी जायचं.

**रिबेका** : मी मिशनमधून परवानगी—

**गोवर्धन** : परवानगी कसली? मिशनला देणगी दे न छोटी. दोनशे रुपये, तीनशे रुपये —आं? पाहा, आजवर मिशननं तुला दिलं. आता परतफेड करायची ही केवढी नामी संधी आहे. मिशनकडून परवानगी मिळेल. हंड्रेड परसेंट. देणगीसाठी दे आर रेडी फॉर एनिथिंग. आय नो दीज मिशन्स.

**रिबेका** : मग मी विचारून सांगेन. उद्या—

**गोवर्धन** : विल बी टू लेट. अरे पूछना क्या है? बताना! उद्याला उशीर होणार. पाहा, असा चान्स पुन्हा मिळणार नाही. मुंबईत लाखो सुंदर मुली आहेत. पण तुझा चेहरा सिंपथेटिक वाटला मला. बोलो, हां या ना...

(तो उतावळेपणाने चुटक्या वाजवतो. क्षणभर अवघडून रिबेका अखेर 'हो'ची मान वेळावते. तो तिला चॉकलेट देतो).

तुला पिक अप करीन मी इथूनच. सकाळी नऊ वाजता—(रिबेका झटकन नाहीशी होते. क्षणभर गोवर्धन हसत उभा. विजयी. त्याच्यावरचा प्रकाश मावळतो. खोली-मधे पद्मिनी, मामी आणि रिबेका होत्या त्याच स्थितीमधे.)

**मामी** : सापळ्यामधे चॉकलेट ठेवून तुला पकडलं तर त्यानं.

**रिबेका** : हो. दुसऱ्या दिवशी मी चॉकलेटं उधळली. दोन्ही हातांनी. दिव्यांचा लखलखाट, सीनरीचा झगझगाट—एकूणच सगळा थाट. मी दिपून गेले. आमच्या ब्लॅक अँड व्हाइट अनाथाश्रमापेक्षा ही टेक्निकलर्ड मायानगरी किती वेगळी होती. फॅशनेबल लोक. हिंडायला क्लायंटसच्या गाड्या, आणि हातात खेळता पैसा.

**मामी** : हे महत्त्वाचं.

**पद्मिनी** : सिस्टर्सनी हरकत घेतली नाही?

**रिबेका** : छे. शाळा सुटल्यावर सिस्टर्सचा धाक एकूणच कमी झाला होता. सिस्टर मिरिअम केव्हाच वारली होती. आता मला फक्त एकच सल्लागार मित्र होता. गोवर्धन.

**मामी** : हंऽ

**रिबेका** : गोड बोलून त्यानं मला भारून टाकलं. रोज नवीन कॉंट्रॅक्ट आणायचा. पाहता पाहता माझं नाव झालं. मला बऱ्यापैकी मागणी येऊ लागली. तो माझा एजंट बनला. त्यानं माझ्याकडून कॉन्ट्रॅक्टवर सही करून घेतली. मी फक्त त्याच्याच मार्फत काम करायचं असा करार होता तो. त्याला साठ टक्के, मला चाळीस.

**मामी** : कहर आहे. अगं शिकलेली मुलगी तू. तुला कराराचा अर्थ कळला नाही ?

**रिबेका** : करार वाचला असता तर कळला असता ना. पण एवढा आंधळा विश्वास होता माझा त्याच्यावर—

[ टेलिफोनची घंटा खणखणते. रिबेका लगेच भेदरलेली. मामी आवेशाने उठते. ]

**मामी** : घाबरायला काय झालं ? मी पाहते त्याच्याकडे.

[ मामी फोन घेते ].

काय रे मेल्या. तुला बजावून—आं ? कोण ? अगबाई. माफ करा. मला वाटलं...

आं ? हो आहे. आपण—

[ दारापाशी येऊन ]

अगं पद्मिनी तुला फोन आहे. खूप अर्जंट आहे म्हणे.

[ पद्मिनी फोन घेते. ]

**पद्मिनी** : हॅलो—हो मी पद्मिनी नाईक. नाही. इथे नाहीत कारखानीस. इथे कसे असतील ? आता मला काय ठाऊक ? नेहमीप्रमाणे बँकेतून निघाले साडेचार वाजता...काहीच कल्पना नाही. आं ? काय ? हो त्यांचा फोन आला तर सांगेन. पण शक्यता कमीच.

[ फोन ठेवते. परत येते. ]

कमाल आहे. कारखानिसांची चौकशी करीत होते त्यांचे शेजारी. फार अर्जंट काम आहे म्हणे...

**मामी** : काय अर्जंट काम होतं एवढं ?

**पद्मिनी** : कुणास ठाऊक ? मी दिला फोन ठेवून...बरं ते जाऊ दे. पुढे सांग नं.

**मामी** : या फोनचा मेला मधे "व्यत्यय" झाला गं. हं तू चालू ठेव. धारावाहिक कार्यक्रम की अगली कडी.

**रिबेका** : मामी, तुम्हाला गंमतच वाटते नं सगळी ?

**मामी** : अगं हा सुद्धा एक कावा आहे बरं. काही अरिष्ट सामोर आलं, की टिपं गाळण्याऐवजी दात विचकून हसायचं. संकट छू. शिकशील तूही.

**पद्मिनी** : मामी, तुम्हाला वेडं कुणी ठरवलं ? त्यांचीच डोकी तपासली पाहिजेत.

**मामी** : कर थट्टा—ए सदाफुली—ए आक्का, सांग नं पुढे.

**रिबेका** : मी जाहिरातविश्वाच्या चक्रात पुरती अडकले. गोवर्धनला आता अमाप पैसा मिळू लागला. करारावर मी सही केल्यापासून तो बदलून गेला होता. तो मग्रूरपणाने वागू लागला. हळूहळू त्यानं चंदेरी दुनियेकडे आपलं लक्ष वळवलं. मिळेल ती बी ग्रेड फिल्म तो घेऊ लागला. भोजपुरी, राजस्थानी, गुजराती. या फिल्ममधून मी दुय्यम तिय्यम दर्जाच्या भूमिका करू लागले. हीरोची बहीण, हिरॉइनची मैत्रीण किंवा व्हॅंपसुद्धा. कपडे घालण्यावरून, किंवा खरं तर काढण्यावरून

आमची भांडणं होऊ लागली. चॉकलेटं उधळणारी परी आता कॅबेरे डान्स करू लागली.

[ अचानक अंधारून येतं. एक गरम चालू गाणं कर्कश आवाजात सुरू होतं. प्रकाशझोतामधे पाय ताणून, चिरूट ओढीत बसलेला गोवर्धन दिसतो. एकदम "कट् कट्!" असा भुंकल्यासारखा आवाज. गाणं सप्पकन थांबतं. पाठोपाठ पुरुषाचा संतप्त आवाज—"रिबेका यह क्या? तुमने दुपट्टा फेकना था." नृत्याच्या पोषाकात रिबेका चवताळून गोवर्धनच्या अंगावर चालून येते. ]

**गोवर्धन** : रिबेका, काय झालंय तुला? हा चौथा टेक बिघडवलास तू.

**रिबेका** : मी साफ सांगते. मी अंगावरचा दुपट्टा काढून फेकणार नाही. वेड्यावाकड्या ॲक्शन्स करणार नाही.

**गोवर्धन** : यूअर फादर विल डू इट. इथे 'सति अनसूया'चं शूटिंग नाही चाललं. डायरेक्टर सांगेल तसं तुला करायलाच पाहिजे. तुझ्या कॉन्ट्रॅक्टमधे लिहिलं आहे तसं.

**रिबेका** : माझ्या कॉन्ट्रॅक्टमधे कपडे काढायचे असं लिहिलं नाही आहे.

**गोवर्धन** : अच्छा? मेरी बिल्ली मुझपर म्याऊ? तुझं स्टारडम तुझ्या डोक्यात गेलंय.

**रिबेका** : नाही! माझं स्टारडम तुझ्या डोक्यात गेलंय.

**गोवर्धन** : थांब, मी तुला दाखवतो. काढ तो दुपट्टा.

[ तिचा दुपट्टा खेचायला जातो. एखादा फिल्मी हीरो अवतरावा त्याप्रमाणे डेव्हिड—एक धष्टपुष्ट मजबूत अंगयष्टीचा तरुण, अचानक उगवतो. तो गोवर्धनचा हात वरच्यावर धरतो. ]

**डेव्हिड** : हात सोड तिचा. गेले सहा दिवस पाहतो आहे मी तुझा तमाशा. खबरदार तिच्यावर कसली सक्ती केलीस तर. ( रिबेका संधी साधून पळ काढते. )

**गोवर्धन** : तू–तू कोण मध्ये नाक खुपसणारा?

**डेव्हिड** : मी? मी याच फिल्ममध्ये स्टंट मॅन आहे. डेव्हिड...पडद्यामागेसुद्धा स्टंट करू शकतो. दाखवू करून?

**गोवर्धन** : तुला मध्ये पडायचं काम नाही, हा आमचा मामला आहे. एजंट आहे मी तिचा. कायद्याचा.

**डेव्हिड** : मला कायद्याची भाषा कळत नाही. मला फक्त एक भाषा कळते. [ त्याचं बखोट धरतो. ] गोवर्धन कुठे गेला, कुणाला कळायचं नाही बघ. तुझा वकील बसेल वाट बघत.. काय? तर आता फूट.

[ गोवर्धन चपळाईने नाहीसा होतो. डेव्हिड उभा. क्षणभराने तोही काळोखात दिसेनासा होतो प्रकाश पुन्हा तिघीजणींवर ]

**मामी** : काय बाई तरी, हे अगदी सिनेमातल्या सारखं झालं.

**पद्मिनी :** कित्येक वेळा नाट्यपूर्ण घटना घडतात आयुष्यात. पण तेच कुणी नाटकात किंवा सिनेमात दाखवलं की आपण म्हणतो, किती अतिशयोक्ती.

**मामी :** गोवर्धनच्या झोटिंगशाहीला आळा बसला की नाही या किस्शानंतर ? त्याची दादागिरी नाहीशी नाही झाली ?

**रिबेका :** तोच नाहीसा झाला माझ्या आयुष्यातनं. डेव्हिडचा त्यानं पुरता धसका घेतला. बोलून चालून कासिमभाईच्या टोळीतला होता तो.

**मामी :** कासिमभाई ?

**रिबेका :** इंडस्ट्रीमधले एक नावाजलेले फाइट मास्टर. बाहेरही त्यांचा खूप दरारा होता. डेव्हिड त्यांचा पट्टशिष्य. काय उलटीसुलटी मोटरसायकल चालवायचा, धावत्या आगगाडीच्या टपावरून उडी मारायचा, आणि असा घोडा पळवायचा—— पाहात राहावं.

**मामी :** थोडक्यात म्हणजे या घोडेस्वारावर चॉकलेट परीचं मन जडलं.

**रिबेका :** एकदम नाही. सुरुवातीला मला तो आपला बॉडीगार्ड म्हणून बरा वाटायचा. पुढे मात्र मला तो खरंच आवडायला लागला. माझ्यावर खूप जीव होता त्याचा. चॅरिटीचा वास नसलेलं मी अनुभवलेलं ते पहिलं प्रेम. आम्ही लग्न ठरवलं. त्याच्या आईला खूप आनंद झाला. बिचारीला आशा वाटली की, लग्नानंतर तरी मुलाचे स्टंट सुटतील. तो चार-चौघांसारखी नोकरी करील. तिनं आमच्या लग्नाला आनंदानं होकार दिला. आम्हालाही लवकर लग्न करायचं होतं. कारण—कारण—

**मामी :** कारण तसंच काही ' कारण ' घडलं होतं.

**रिबेका :** हो. एकदा लग्न करायचं नक्की झाल्यावर आम्ही वेडिंग बेल्सची वाट नाही पाहिली...आम्ही केव्हाच एकत्र राह्यला लागलो होतो. डेव्हिड तसा धार्मिक होता. ईस्टरच्या शुभमुहूर्तावर लग्न करायची त्याची इच्छा होती. लगेच लग्न करा म्हणून त्याच्या आईने आग्रह धरला. पण ईस्टरलाच लग्न करायचं असा डेव्हिडचा पक्का निश्चय होता.

**मामी :** अगबाई. क्रिश्चन लोकांच्यात असतो मुहूर्त ?

**पद्मिनी :** मामी, डेव्हिड क्रिश्चन असला तरी भारतीय होता.

**रिबेका :** दीडच महिना होता ईस्टरला. पण डेव्हिडसाठी ईस्टर कधी उगवलाच नाही.

**पद्मिनी :** काय—कसं झालं ?

**रिबेका :** कासिमभाई हल्ली खूप दारू प्यायला लागले होते. एका फिल्मचं क्लायमॅक्सचं शूटिंग चालू होतं. जमिनीत पेरलेल्या माइन्समधून हीरो–म्हणजेच हीरोचा डबल–डेव्हिड पळत जातो असं दृश्य होतं. तो पळत सुटतो आणि मागेपुढे धडाडधडम् स्फोट होतात. कंट्रोलवर कासिमभाई बसले होते. टेर नशेत. धुत्त. शॉट सुरू झाला. डेव्हिड पळू लागला. कासिमभाईंनी दहा सेकंद आधी चाप ओढला. एक

माइन वर उडाला तो–तो डेव्हिडला घेऊनच.

[ स्फोट. पुरुषाची भेसूर किंकाळी. काही काळ तिघी स्तब्ध, सुन्न. ]

**पद्मिनी :** ओ. आणि तू–तुला–तुझ्या पोटात पाप वाढत होतं.

**रिबेका :** ( तिडिकीने ) पाप ? नाही. चूक म्हणा हवं तर. उतावळेपणाची चूक. पण मी पाप कधीच मानलं नाही ते. मनानं आमचं लग्न झालं होतं.

**पद्मिनी :** मनाचे व्यवहार समाजाला कुठे पटतात ?

**रिबेका :** समाजाला नाही आणि कायद्याला तर नाहीच नाही. कायद्याच्या दृष्टीनं एक बेवारशी आई एका बेवारशी मुलाला जन्म देते. बस्स. चिखलात आणखी एक कमळ उगवतं.

**पद्मिनी :** पण तू—तू काही केलं नाहीस ? कितीतरी क्लिनिक्स निघाली आहेत हल्ली–

**मामी :** हो. अगदी टॉन्सिल्स काढाव्यात इतकं सोपं झालं म्हणे आताशा, आपलं ऐकलं हो.

**रिबेका :** मला नव्हतं करून घ्यायचं तसलं काही. डेव्हिडची आठवण मला बुजवायची नव्हती. आमचे संबंध आम्ही रीतसर शिक्कामोर्तब केले नाही हे माझं आणि माझ्या मुलाचं दुर्दैव.

**मामी :** कुठे गेलीस तू तशा अवस्थेत ?

**रिबेका :** मिशनमध्ये. परत नन्सना शरण गेले. त्यांनी पुन्हा एकदा मला आसरा दिला. मला मुलगा झाला. मायकल. छोटा डेव्हिड...माझ्यापेक्षा तो नशिबवान ठरला. त्याला तत्काळ एका हौशी नवराबायकोनं अॅडॉप्ट केलं.

**पद्मिनी :** कुठे असतो तो ?

**रिबेका :** स्वीडनमध्ये कुठेतरी. त्याचे दत्तक आईवडील स्वीडिश आहेत आणि फार चांगले आहेत, एवढीच माहिती मला कळू शकली...मुलाच्या भल्यासाठी त्याला विसरून जा असं सिस्टर्सनी मला सांगितलं. म्हणाल्या, त्याला तरी एक निष्पाप सुंदर जीवन जगू दे. साता समुद्रापलीकडे.... मी–पुन्हा एकदा नाळ कापला...आणि आपलं आयुष्य हातात घेतलं. पुन्हा काम करू लागले...आणि मग तो उगवला. एखाद्या जुन्या रोगासारखा . गोवर्धन.

**पद्मिनी :** अजून कॉन्ट्रॅक्ट चालूच होतं ते ?

**रिबेका :** कॉन्ट्रॅक्ट ? त्यानं वर अडॉप्शन पेपर्सची कॉपी मिळवली होती. त्या कागदांच्या जोरावर त्यानं उघडउघड ब्लॅकमेल सुरू केली.

**मामी :** थोडक्यात, कोंबडी पुन्हा सोन्याची अंडी देऊ लागली.

**रिबेका :** आता तर त्याला कसलीच भीती नव्हती. माझा कुणी कैवारी उरला नव्हता. त्यानं एकेक नवीन रूप धारण करायला सुरुवात केली. " अमका मोठा प्रोड्यूसर आहे त्याला खूष कर ", "तमका गब्बर फायनान्सर आहे त्याच्याशी नीट वाग," असं

सांगू लागला. मी मुळातच मूर्ख. मला वाटायचं "नीट वाग" म्हणजे नम्रपणाने नमस्कार करून अदबीनं बोलायचं. खरा अर्थ कळला तेव्हा परत अवसानच गळालं माझं...शेवटी मी मनाचा निश्चय केला. गोवर्धनचा तुरुंग फोडून बाहेर पडायचं. स्वतःच स्वतःचं रक्षण करायचं. मी एका शूटिंगमधे ऐन शॉटमधून पळाले...दहा दिवसांनी त्यानं मला शोधून काढलं. मी पुन्हा पळाले...ती अजून पळतेच आहे. त्यानंही पिच्छा सोडला नाही. मी कुठेही गेले तरी तो मला शोधून काढतो. माझ्या इतिहासाचे कागद माझ्यापुढे नाचवतो. मी पुन्हा पळते...आता इथे आले आहे. पार थकून गेले आहे.

**पद्मिनी :** रिबेका, हे विलक्षण आहे. कायद्यानं तुला संरक्षण मिळायला हवं.

**रिबेका :** तोही अनुभव घेतला. कायद्याचा. पण एकट्या असहाय मुलीला वाली नसतो हेच खरं. देवदूत मानावा, तो यमदूत निघावा असं एकदोनदा झालं. शेवटी तोही नाद सोडला.

**पद्मिनी :** पण तुझा—तो—टोनी—तो आहे ना? तो तर सज्जन वाटतो. शिवाय तुझ्यावर किती जीव टाकतो. तुला लग्न कर म्हणतो—

**मामी :** का नाही लग्न करत त्याच्याशी? तुझा जन्माचा पाठशिवणीचा खेळ तरी थांबेल.

**रिबेका :** लग्न? कोणत्या तोंडानं मी टोनीसारख्या तरुणाशी लग्न करू? दुर्दैवानं तो चांगल्या घराण्यातला आहे.

**पद्मिनी :** दुर्दैवानं?

**रिबेका :** हो. माझ्या दुर्दैवानं. श्रीमंत घरंदाज आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे तो. शिकलेला. चांगल्या करिअरचा. सत्शील, गुणी,—आणि मी? कचरा-पेटी खानदानाची, बिन आईबापांची, एका लांडग्याच्या तावडीत सापडलेली बाई, एका अनौरस मुलाची—

**पद्मिनी :** रिबेका, बस्स कर.

**मामी :** तुझा सगळा इतिहास त्याला सांगायची गरज काय?

**पद्मिनी :** तेच म्हणते मी.

**रिबेका :** गरज काय? समाजकंटकांनी आपल्याला फसवून आयुष्यातून उठवलं. आपला खेळ मांडायच्या आतच उधळून लावला. त्याच फसवेगिरीचं लोण आपण चालू ठेवायचं? मग हे दुष्टचक्र थांबणार तरी केव्हा?

[ मामी, पद्मिनी गप्प. ]

नाही! मी टोनीला फसवणार नाही. त्याच्या प्रेमाचा फायदा घेणार नाही...विसरेल मला तो आज ना उद्या. सावरेल काही काळात.

**पद्मिनी :** पण रिबेका—तू—तुझं काय?

**मामी :** पोरी तुझं काय?

[ फोन भेसूर खणाणतो—काही काळ तिघी गोठलेल्या, घंटी ऐकत स्तब्ध. शेवटी मामी उसने अवसान आणून हसते ].

**मामी :** वा. आता या खेपेला हा माझा फोन. मेंटल हॉस्पिटलमधून करतंय कुणीतरी. माझ्यावाचून करमत नाही, असं सांगायला. हॅलो... हो. बोलावते...ते आलं लक्षात. पद्मिनी—कारखानीस.

[ पद्मिनी उठून फोन घेते. ]

**पद्मिनी :** हॅलो. हो, हो, मीच बोलतेय...हां...अहो मघाशी तुमची चौकशी करायला म्हणून इथे फोन केला होता तुमच्या शेजाऱ्यांनी. फारच डेस्परेट वाटले. मला जरा रागच—आं ? काय ? काय ? ? काय ? ? ? ओ गॉड. कुठे ?...रूम नंबर ?—ठीक आहे. निघते मी तत्काळ.

[ फोन ठेवते. ]

कारखानिसांच्या बायकोला हॉस्पिटलमध्ये नेलंय. फार सीरियस आहे ती. तिनं झोपेच्या गोळ्या घेतल्या. पन्नास—

[ भर्रकन सामान आवरू लागते. मामी, रिबेका स्तिंमित. काळोख. ]

२९८६५ २६।४।८८

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ सकाळ. रिबेका अद्याप पांघरून ओढून, टेडीला कुशीत घेऊन गाढ झोपली आहे. मामींचा बिछाना विसकटलेला. पद्मिनीचा पलंग नीटनेटका दिसतो. दूर रेडिओवर भीमसेनचा अभंग. मामी चहा घेऊन येतात. रिबेकाच्या उशाशी उभ्या राहून पेलेबशीचा सहज वाटावा असा आवाज करतात. रिबेका डोळे उघडते. उठून बसते. मामी कप तिच्या जवळच्या टेबलावर ठेवतात. ]

**रिबेका :** गुड मॉर्निंग. वा चहा. बेड टी—

['चहाचा कप उचलते. मामी तिच्या हातून तो काढून घेतात. ]

**मामी :** हां हां हां ! हे काय ? तोंड धुवायच्या आधीच चहा ?

**रिबेका :** अय्या, आधीच चहा घेते मी नेहमी. नंतर टूथपेस्टची चव राहते न तोंडात. मग बेकार लागतो चहा. आणि मामी, इंग्लंडमधेसुद्धा चहा आधी पितात बरं का, ब्रश नंतर करतात.

**मामी :** हो का ? बरं झालं बाई सांगितलंस ते. इंग्लंडला गेले की लक्षात ठेवीन...तू आता निदान चूळ तरी भरून ये. भारत देशात भारतीय रिवाज.

[ रिबेका खोटी खोटी पुटपुटत आत जाते. मामी आपला बिछाना नीट करतात. रिबेका परत येते. ]

**रिबेका :** पद्मिनी काल आलीच नाही ? रात्री ?

**मामी :** नाही ना. हॉस्पिटलमधेच असणार ती अजून....काय झालं असेल त्या कारखानीस बाईचं देव जाणे. फोन पण नाही केला पद्मिनीनं.

[ मामी लेस काढून विणायला बसतात, रिबेका चहा पिते. ]

**रिबेका :** सकाळी सकाळी लेस विणायला बसलात ?

**मामी :** मला मेलीला सकाळ काय अन् दुपार काय ?...लेस विणली की कसं शांत वाटतं, चित्त भरकटत नाही. काय बाई म्हणतात—थेरपी.

[ रिबेका येरझारा घालते. काहीशी अस्वस्थ ]

आज तुला काम नाही काही ? शूटिंग बीटिंग ?

**रिबेका :** नाही. आज फक्त कॉस्टयूम फिटिंग आहे. लंचपर्यंत केव्हाही गेलं तरी चालेल. टोनी येणार आहे. दहा वाजता. आम्ही बरोबर जाऊ.

**मामी :** साडे नऊ वाजले की.

[ रिबेका आणखी एक फेरी मारून, मामींच्या जवळ येऊन बसते. ]

**रिबेका :** मामी मला शिकवा न लेस विणायला.

**मामी :** इश्श्य. तुला कशाला ?

**रिबेका :** थेरपी. प्लीज—

**मामी :** बरं बस. हे बघ ही सुई अशी धरायची.

[ रिबेका क्रोशेचा श्रीगणेशा शिकू लागते. अल्पशा अवधीनंतर बाहेरचे दार उघडते.

पद्मिनी आत येते. रिबेका आणि मामी तिच्याकडे अपेक्षेने पाहतात. पद्मिनीचा चेहरा ओढलेला. ती रात्रभराच्या जागरणाची दिसते. सामान ठेवून ती मोरीकडे जाऊ लागते. दोघींच्या नजरा तिच्यावर खिळलेल्या. ]

**मामी :** ( न राहवून ) काय झालं ?

**पद्मिनी :** ( थबकून ) वाचल्या त्या. मोठ्या मुष्किलीनं. डॉक्टरांनी—सगळ्यांनीच—प्रयत्नांची शिकस्त केली. रात्रभर जीवन मरणाची झुंज चालली होती. . .अखेर पहाटे पहाटे प्रयत्नांना यश आलं. डॉक्टरांना आशा वाटतीय आता.
( मोरीत जाते )

**रिबेका :** बरं झालं बाई, त्या बाई वाचल्या ते.

**मामी :** कुणास ठाऊक बरं झालं का वाईट झालं.

**रिबेका :** ( आश्चर्याने ) मामी !

**मामी :** तिच्या इच्छेविरुद्ध जगवलं तिला. " बये, जन्मभर अंथरुणावर पडून परभार होऊन राहिलीस. पण अजून तुझा भोग संपला नाही. आणखी काही वर्षं तशीच पडून राहा. सतरा वर्षं यातना सोसल्यास थोड्या आणखी सोस. " हेच सांगितलं न तिला ? चांगली बिचारी लांबच्या प्रवासाला निघाली होती. तिला कशाला अडवलं ?
[ पद्मिनी तोंड पुशीत बाहेर येते. मामींना ती दिसत नाही ].
सांग की, का वाचवलं तिला ? तिचं आयुष्य मारे तिला परत मिळवून दिलं—ते आयुष्य तिच्यासाठी कोणी जगणार आहे का ? प्रयत्नांची शिकस्त करून काय साधलं ? तिची जन्मठेप आणखी लांबवून दिली. का ? आं ? कशासाठी ?

**पद्मिनी :** ( शांतपणे ) मामी, तुमच्या शब्दकोषात नीतिमत्ता किंवा 'कर्तव्य' हे शब्द असते तर तुम्हाला कळलं असतं. समोर मरणाच्या दारात तडफडणारा माणूस वाचवण्याजोगता आहे का, त्याला वाचवून काही फायदा आहे का, हे प्रश्न अशा वेळी उद्भवतच नाहीत त्याच्या भविष्याची उठाठेव करणारे आपण कोण ? एकच पर्याय असतो आपल्यापुढे. त्याला वाचवणं.

**मामी :** मला काय ? मी आपली तू सांगतेस त्याच्यावरून म्हटलं. तुलाच त्या कारखानिसांची दया येते. त्यांना बायकोची दिवसरात्र सेवा करावी लागते म्हणून. चांगले सुटले असते. तुझ्या दृष्टीनं सुद्धा किती चांगलं—
( पद्मिनी मामींकडे जळजळीत नजरेने पाहते )
जाऊ दे. चहा आणते तुला. रात्रभराच्या जागरणाची आहेस.
( मामी आत जातात. पद्मिनी बदलायचे कपडे कपाटातून काढते ).

**रिबेका :** तुझा अभिमान वाटतो मला पद्मिनी. आय ॲडमायर यू.
( रिबेका कागद काढून चिठ्ठी लिहू लागते. पद्मिनीची आवराआवर चालू. फोन खणाणतो. आतून येऊन सेवा फोन उचलते ).

**सेवा :** हॅलो—हां हां, हो बरोबर. मीच सेवा श्रॉफ. नाही, आता जागा शिल्लक नाहीत, पेइंग गेस्टसाठी. सॉरी. तिन्ही जागा भरल्या...नाही नाही. एवढ्यात शक्यता दिसत नाही...हो कळवीन. इट्स ऑल राइट. थँक्यू.

[ सेवा फोन ठेवते. परत आत जाते. रिबेकाचे पत्र लिहून झाले आहे. घडी घालून ती ते पाकिटात घालते. ]

**रिबेका :** पद्मिनी, तुला ऑफिसची घाई तर नाही ? मी पटकन आधी तयार झाले तर चालेल ?

**पद्मिनी :** चालेल की. मी आज ऑफिसमध्ये जाणारच नाहीये. रजा टाकणार आहे. पुन्हा हॉस्पिटलमध्ये जायचंय मला. त्यांना—कारखानिसांना रिलीव करायला... तू हो तयार.

[ रिबेका मोरीत जाते. पद्मिनीचे अवसान एकदम गळते. ती पलंगावर बसते. डोके हातात खुपसून निपचीत अशी. चहा घेऊन मामी येतात. ]

**मामी :** घे ग...पद्मिनी...ए...अग मी खुळी काय बोलते ते जिवाला लावून नको घेत जाऊस, बाई. काय आहे, माझ्या मनात सेन्सॉरच नाहीये बघ. त्यामुळे जे काही डोक्यात येतं ते सरळ बाहेरच पडतं, आणि घोटाळा होतो. तुला त्रास झाला निष्कारण—

**पद्मिनी :** त्रास झाला, कारण मामी कदाचित—कदाचित तुम्ही माझ्या मनात खोल कुठेतरी दडलेलं बोललात. जे स्वतःपाशी सुद्धा कबूल करायची माझी हिम्मत नाही. ...पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या संस्कारांचं दडपण मी कसं विसरू ? हं. नीतिमत्ता ! कर्तव्य ! पोकळ शब्द—

**मामी :** अग याच शब्दांच्या जोरावर एका बाईचे प्राण वाचवलेस ना तू ? मग शब्द पोकळ कसे ? खोल मनात मेलं काहीही असू दे—तू केलंस ते बरोबर केलंस बघ. सुखाची झोप येईल तुला...निवून चाललाय घे.

[ पद्मिनी कप तोंडाला लावते. कपडे बदलून रिबेका बाहेर येते. ]

**रिबेका :** मामी, मी जाऊन येते—

**मामी :** हे काय, आधीच कुठे चाललीस ?

**रिबेका :** ब्यूटी सलूनमध्ये. केस ब्लो ड्राय करून घेईन. चिकट चिकट होतात या मुंबईच्या हवेत. छान शांपू करून घेणार आहे.

**मामी :** अग केस धुवायला मेलं बाहेर दुकानात कशाला जायचं ? मी देते तुझं भुरकुल धुऊन छान खसखसून. शिकेकाईनं.

**रिबेका :** पुन्हा केव्हातरी. मला आता बाहेर पडायचंय.

**मामी :** पण तो—तो टोनी यायचाय ना तुझ्याकडे आता ?

**रिबेका :** म्हणूनच...ही चिठ्ठी द्या त्याला—[ मामींना पाकीट देते. ]

ओ. के. पद्मिनी. ऑल द बेस्ट बाय—

[ रिबेका बाहेर पडते. पद्मिनी मोरीत जाते. मामी चिंतित. हातातले पाकीट न्याहाळतात. मग निर्धार करून ते काळजीपूर्वक उघडतात. आतली चिठ्ठी वाचू लागतात. दिवे मावळतात. एकच स्पॉट उजळतो, आणि रिबेका निश्चल उभी असलेली दिसते. ]

**रिबेका :** प्रिय टोनी, माफ कर, मी ठरल्याप्रमाणे तुझ्यासाठी घरी थांबून राहिले नाही. काही गोष्टी जेव्हा प्रत्यक्ष समोरासमोर सांगायला कठीण वाटतात तेव्हा त्या कागदावर उतरवण्याचा एकच मार्ग उरतो. मी म्हणूनच तुला चिठ्ठी लिहिण्याची पळवाट पत्करली. माझ्याशी लग्न करायची इच्छा तू अनेक वेळा प्रकट केलीस. तुझे माझ्यावर मनापासून प्रेम आहे हे मी जाणते. पण कोणत्याही परिस्थितीत मला तुझ्याशी लग्न करता येणार नाही. एवढंच नाही, तर माझ्या मजबूरीचं कारणही तुला मी सांगू शकणार नाही. अशा परिस्थितीत आपली मैत्री चालू ठेवणं मला गैर वाटतं. ती इथेच थांबवण्याचा निर्णय मी घेत आहे. हा निर्णय कठीण आहे. तो पार पाडायला मला मदत कर. मला भेटण्याचा प्रयत्न करू नकोस. रिबेका.

[ रिबेकावरचा स्पॉट मावळतो. ती नाहीशी होते. दृश्य पूर्ववत् दिसू लागते. मामी शून्यात बघत सुन्न बसलेल्या. हातात उघडे पत्र. थोड्या वेळाने त्या पत्राची घडी घालू लागतात. तेवढ्यात आतून सेवा येते. ]

**सेवा :** ओहो. मामी तुम्हाला पत्र ? कुणाचं ?

**मामी :** मला कशाला कुणाचं पत्र येणारे ?

**सेवा :** मग तुम्ही लिहिलंत ?

**मामी :** मी कुणाला लिहिणार आहे ?... हे रिबेकाचं पत्र आहे. म्हणजे, तिनं लिहिलेलं त्या टोनीला. त्याला द्यायला म्हणून दिलं होतं माझ्याकडे. मी आपली चोरून वाचीत होते.

**सेवा :** मामी, कमालच करता तुम्ही. एक तर दुसऱ्याची पत्रं चोरून वाचता...आणि वर खुशाल कबूल करता. तुम्हाला सोडलं कसं असायलमूमधून ?

**मामी :** द्या धाडून परत. नाहीतरी इथे सारखी कडमडत, धडपडत असते मी... तिकडेच बरी.

**सेवा :** नको ग बाई. चेष्टेतसुद्धा तसं मनात आणू नका.... बरं हे पाहा, एक छान ऑर्डर आलीय तुमच्यासाठी. माझ्या एका मावसबहिणीच्या मैत्रिणीच्या भाचीचं लग्न ठरलंय. ती नवं घर सजवतीय. तिला पडद्यांचा सेट हवाय. श्रीमंत आहेत. छान पैसे देतील. होणार का दोन महिन्यांत ?

**मामी :** होईल की. आणि तुमच्या मावसबहिणीच्या मैत्रिणीची भाची. म्हणजे घरचंच कार्य.

**सेवा :** तुम्ही म्हणजे मामी–बरं हे पाहा, ते अनरशाचं पीठ मळून ठेवलंयत सकाळपासून. त्याचं काय करणार आहात ?

**मामी :** अनरसे.

[ सेवाताई हसत आत जातात. मामींना काहीतरी सुचून त्या उठतात. ]

सेवाताई–एक मिनिट.

[ मामी पाठोपाठ आत जातात. पद्मिनी मोरीतून बाहेर येते. ती बाहेर जायच्या तयारीत. बाहेरची घंटा वाजते. ]

**पद्मिनी :** ( ओरडून ), पाहते मी—

[ पद्मिनी बाहेरचा दरवाजा उघडते. टोनी आत येतो. ]

**टोनी :** गुड मॉर्निंग. आहे ? रिबेका ?

**पद्मिनी :** अं...नाही. बाहेर गेलीय ती...पण एक मिनिट. तुमच्यासाठी निरोप ठेवलाय मला वाटतं...मामी, रिबेकाकडे आलेत. तुम्ही बसा न...मामी गेले मी. हॉस्पिटलमधे. संध्याकाळी येईन.

[ पद्मिनी बाहेर जाते. टोनी दालनातल्या खुर्चीत बसतो. आतल्या बाजूने मामी दालनात येतात. टोनीच्या हातात पत्र देतात. त्याच्याकडे पाहात बाजूला उभ्या राहतात. टोनी पत्र वाचतो. वाचता वाचता उठून उभा राहतो. त्याचा चेहरा उतरत जातो. क्षणभर स्तब्धता. टोनी अखेर वाचलेल्या पत्राची घडी घालतो. जायला वळतो. ]

**मामी :** थांबा. जाऊ नका तुम्ही. मला तुमच्याशी बोलायचंय.. रिबेकाच्या संबंधात.

[ टोनी चमकून उभा राहतो. काहीसा अनिश्चित. मामींकडे त्याची पाठ आहे. ]

त्या पत्रामधे काय आहे ते ठाऊक आहे मला. ( टोनी वळतो ).

आपण आत बोलू या...इथे अगदी दारात नको.

( मामी आत खोलीत येतात. टोनी दारात थबकतो ) हं, हं, या आत. परवानगी काढलीय मी.

( टोनी खोलीत उतरतो, काहीशा अनिच्छेने ) तुमच्या भानगडीत मी नाक खुपसते याचं नवल वाटत असेल नाही तुम्हाला ?

**टोनी :** ( क्षणभर थांबून ) हो.

**मामी :** दोन कारणं आहेत. एक तर मला सवय आहे, लोकांच्या उठाठेवी करायची. छंदच म्हणा न. आपपर भाव नाही काय ?

**टोनी :** हे पाहा. माझी मनःस्थिती—

**मामी :** आणि दुसरं कारण म्हणजे तुमची पोरगी मला फार आवडते. रिबेका. तिच्यासाठी काळीज तुटतं माझं...भावनेच्या आहारी जाऊन ती स्वतःचं नुकसान करून घेते आहे हे मी डोळ्यांनी पाहतीय. म्हणूनच मी हा अव्यापारेषु व्यापार करायचं

ठरवलं... रिबेकाचा पण तुमच्यावर फार जीव आहे बरं.

**टोनी** : म्हणूनच ती मला सोडून चाललीय ?

**मामी** : हो. बरोबर. रिबेकाच्या आयुष्यात अनेक दुर्दैवी घटना घडल्या.. आपलं चारित्र्य डागाळलेलं आहे, तेव्हा एका भल्या घरंदाज माणसाला सामोरं जायची आपली लायकी नाही, हे तिच्या मनानं घेतलं.. बरं, तुम्हाला अज्ञानात ठेवून तुम्हाला फसवण्याचीही तिची इच्छा नव्हती. तेही आम्ही सुचवून पाहिलं—पण ती हट्टी आहे. निग्रही आहे.

**टोनी** : पण मला अज्ञानात ठेवायची गरजच काय ? माझ्याबद्दल एवढी खात्री वाटू नये तिला ? माझी—माझ्या प्रेमाची हीच परीक्षा केली तिनं ?

**मामी** : प्रेमाची परीक्षा वगैरे बोलणं सोपं आहे...पण त्या पोरीनं आयुष्यात इतके वेळा ठोकर खाल्ली आहे की आता पुन्हा परीक्षा देण्याची किंवा घेण्याची तिच्यात हिम्मतच नाही उरली. तिची कहाणी तुम्हाला सहन होणार नाही, असं तिला वाटलं त्यात काय वावगं झालं ?

**टोनी** : मला वाटतं की मला काय आणि किती सहन होईल, हे मी ठरवू शकतो.

**मामी** : बरोबर. अगदी बरोबर. म्हणूनच आता तुम्हाला थांबवण्याचा उपद्व्याप मी केला...एवीतेवी तिनं हे प्रकरण संपवलेलंच आहे...तेव्हा आता माझी विनंती एकच, तिचा इतिहास ऐकल्यावर तुम्हाला खरोखरच पळ काढावासा वाटला तर गुपचुप या दारानं पसार व्हायचं. पण चुकूनसुद्धा तिला यातलं कधीच काही कळू द्यायचं नाही. म्हणजे निदान तिच्या स्वाभिमानाला तरी तडा जायचा नाही.

**टोनी** : प्लीज. आपलं सगळंच बोलणं अधांतरी चाललंय. नक्की काय प्रॉब्लेम आहे तो मला सांगाल का ? आता माझा जास्त अंत नका पाहू.

**मामी** : ठीक आहे. ऐका तर मग—

[ अचानक अंधार. संगीत. या संगीतामधेच मिसळतो तान्ह्या मुलाच्या रडण्याचा आवाज. थोड्या अवधीनंतर प्रकाश उजळतो. टोनी आणि मामी होते त्याच स्थितीमधे. टोनी चेहरा झाकून घेतो ].

**मामी** : नाही मानवलं ना ? तुम्हाला वाटलं होतं तितकं तुमचं पुरुषहृदय भक्कम नाही आहे तर. तुम्ही जा टोनी...आयुष्यातलं आणखी एक गणित चुकलं असं मी समजेन.

**टोनी** : जायचं असतं तर या आधीच गेलो असतो.

**मामी** : म्हणजे—तुम्ही—खरंच तुम्ही टिकून आहात ?...तुम्ही दोन दिवस—तीन दिवस नीट विचार करा. मागचा आणि पुढचा. आणि मग तुमचा निर्णय घ्या...

**टोनी** : निर्णय मी घेतला आहे.

[ बाहेरचं दार उघडून आवाज न करता रिबेका आलेली. ती खोलीच्या दारापर्यंत येऊन पोहोचते. टोनी हातातले पत्र फाडतो ].

मला निर्णय घ्यायला दोन-तीन दिवसांचा अवधी नको. मी रिबेकावर प्रेम करतो ही वस्तुस्थिती आहे. ती दोन-तीन दिवसांनी बदलणार नाही. तिच्याशी मी लग्न करणार आहे. तिच्या आयुष्यात यापूर्वी काय घडलं त्याच्याशी मला कर्तव्य नाही. तिचा इतिहास मागे राहिला. पुढे आहे ते भविष्य...तिचं. माझं. दोघांचं.

( मामी भारावलेल्या. रिबेका निश्चल ).

**मामी :** विलक्षण. एवढ्या मोठ्या मनाचा पुरुष असू शकतो ? पुरुषजातीविषयीच्या माझ्या कल्पनांना केवढा मोठा धक्का दिलात तुम्ही. असो. अपवाद असतात.

[ रिबेका आता दारात येते, तिला वस्तुस्थितीचे आकलन झालेले ].

**रिबेका :** मामी तुम्ही–तुम्ही–टोनीला सगळं—हाऊ डेअर यू.

**मामी :** ए...रागावू नकोस. अंत भला सो भला. हे बघ. ही लेस वीण फार राग आला तर, हं. ही घे—थेरपी ग थेरपी.

[ तिच्या अंगावर लेस टाकतात, आणि मोरीत पळतात. टोनी आणि रिबेका क्षणभर एकमेकांकडे पाहात उभे. मग धावत एकमेकांकडे जाऊन–आवेगाने मिठी मारतात. काळोख. ]

## अंक तिसरा

### प्रवेश दुसरा

[ मंच रिकामा आहे. थोड्या वेळाने बाहेरचे दार उघडते आणि सेवा, मामी आणि पद्मिनी हसत हसत आत येतात. तिघींनी चांगले कपडे, आणि थोडे दागिने घातले आहेत. दालनातून त्या खोलीत येतात. ]

**सेवा :** छान समारंभ झाला नाही ?

**पद्मिनी :** अगदी सुटसुटीत.

**मामी :** हुंडा नाही, वऱ्हाड नाही, मानपान नाही की गोंधळ नाही.

**सेवा :** किती सुंदर दिसत होती रिबेका.

**पद्मिनी :** अगदी अनुरूप जोडा आहे खरंच.

**सेवा :** माझा तर अजून विश्वासच नाही बसत आहे. ती आता आता इंटरव्ह्यू द्यायला आली होती इथे.

**मामी :** सगळ्यांना चटका लावून गेली.

**पद्मिनी :** मामी, काय बोलता ? ' चटका ' लावून जाण्याला वेगळा संदर्भ असतो.

**मामी :** हो का ? मी आपलं चांगलं बोलायला गेले हो. म्हणा माझा संदर्भ कायम चुकतच असतो. माझं म्हणणं एवढंच की पाहता पाहता पोरगी सासरी निघाली.

**पद्मिनी :** सासर आहे कुठे विचारीला ?

**मामी :** का ? आहे की. गोव्याला चांगली सासू सासरा दोघं आहेत.

**पद्मिनी :** हो, पण त्यांना अजून पत्ता कुठाय लग्नाचा ?

**सेवा :** ते हिला सून म्हणून मान्य करतील ?

**मामी :** काय की बाई.

**पद्मिनी :** या दोघांनी एवढी घाई करायला नको होती. रीतसर आईवडिलांचे आशीर्वाद घेऊन चांगलं धूमधडाक्यात लग्न करायचं.

**सेवा :** आणि आईवडिलांनी विरोध केला असता म्हणजे मग ? जड गेलं असतं एकुण प्रकरण. टोनीन तो चान्सच घेतला नाही...आता काय, दोघं फार फार तर रागावतील, तणतणतील, घराची दारं बंद करून घेतील. काही बिघडत नाही. पोरीला नसलं सासर तर नाही.

**मामी :** असं कसं ? कुठेतरी हक्काची, मायेची जागा नको का ? रिबेकाला विचारीला माहेरही नाही.

**सेवा :** का ? हे माहेर आहे की तिचं.

**मामी :** हे मात्र खरं बोललात.

**पद्मिनी :** आता दोघं येताहेत न इथे ? उरलेलं सामान न्यायला ?

**सेवा :** अगबाई विसरलेच की. येतीलच एवढ्यात.

**मामी :** हो खरंच, सेवाताई ही तुमची बोरमाळ घ्या पाहू—
( गळ्यातली बोरमाळ काढू लागतात. )

**सेवा :** राहू दे न जरा वेळ. ती काय बोचतिय तुम्हाला ? रिबेका आणि टोनी येऊन गेले की द्या परत.

**मामी :** हो खरंच. जावईबापूंना बसवायचं कुठे ? दारात ?

**सेवा :** दारात कशाला ? आत घरात बसवू की. तुमचाच विरोध होता मामी. मी फराळाचं काढून ठेवते, त्यांना वेळ नाही फार. दुपारच्या फ्लाइटन अंदमानला जाताहेत दोघं.

**मामी :** हनीमूनसाठी निवडून अंदमान कशाला निवडलं ?
[ सेवा आत जाते. मामी आणि पद्मिनी बाहेरच्या खुर्च्या आत आणतात. ]
खुशबूदार शांपू शिकेला; पतग छाप हिंग, ( हसते ) आता ओकबोकं वाटेल या खोलीत, सदाफुली गेली म्हणजे.

**पद्मिनी :** गेली म्हणजे काय, गेलीच की ती. तुम्हीच तर जमवून दिलंत सगळं, एवढ्या

उचापती करून. आता रडू नका.

**मामी :** मी सुद्धा शब्दांच्या आहारी जाते बरं कधी कधी. कर्तव्य. नीतिमत्ता...खरंच. -तुझ्या त्या मिसेस कारखानीस गेल्या घरी ?

**पद्मिनी :** कालच. खूप क्षीण झाल्या आहेत. आता तर जास्तच ताण पडतो त्यांच्या-वर–मिस्टर कारखानिसांच्यावर.

**मामी :** साहजिकच आहे.

**पद्मिनी :** वाटतं, काहीही करून त्यांचा भार हलका करावा. त्यांना मदत करावी. दुसऱ्याच्या अडचणीत ते नेहमी धावून जातात. मलाच केवढा आधार दिला त्यांनी.

**मामी :** तू सुद्धा केलीस की हॉस्पिटलमध्ये त्यांना मदत. दोन रात्री जागून काढल्यास. थोडी परतफेड झाली समज त्यांच्या उपकारांची.

**पद्मिनी :** मामी, उपकार म्हणजे कागदी चलन का आहे परत फेडायला ? उपकार असे फिटत नाहीत...आणि ते फिटावेत अशी माझी इच्छाही नाही. मला फक्त त्यांना या अवस्थेत पाहवत नाही. असहाय, दीनवाणे.

[ टेलिफोनची घंटा वाजते. ]

**मामी :** पाहतेस तू ? मी जरा सेवाताईंना मदत करते.

[ मामी आत जातात. पद्मिनी फोन उचलते. ]

**पद्मिनी :** हलो हलो—कोण बोलतंय ? हलो—

[ ती फोन ठेवून खोलीत येते. ]

**मामी :** ( आतून ओरडून ) कुणाचा फोन होता ?

**पद्मिनी :** रॉंग नंबर असणार. त्यानी ठेवून दिला खाली.

[ पद्मिनी खोलीत घाईने आवराआवरी करते. वरवरची अडगळ घेऊन मोरीत जाते. दाराची घंटा वाजते. थोडा वेळ जातो. दार उघडायला कुणी येत नाही. पुन्हा घंटा. आतून गडबडीने मामी येतात. ]

**मामी :** अगं पद्मिनी, दार उघड ना—मी आत गडबडीत आहे. आली, आली रिबेका आणि टोनी. या या या—( मामी दरवाजा उघडतात. कारखानीस आत येतात. मामी गोंधळतात. )

**कारखानीस :** आहेत का ? मिसेस नाईक ?

**मामी :** अं—हो ..हो...या...कशी आहे तुमच्या सौंची तब्येत ?

**कारखानीस :** आता घरी आणलं तिला...

**मामी :** बरं झालं... तुम्ही बसा नं. इथे दारात कशाला ? खुर्च्या आत नेल्या आहेत. खोलीत या—खोलीत बसा—

( कारखानीस अनिश्चित उभे ) अहो, या. चालेल.

[ कारखानीस खोलीत उतरतात. खुर्चीत बसतात. काही काळाने आतून मोरीतून पद्मिनी बाहेर येते. कारखानिसांना पाहून ती स्तिमित ]

**पद्मिनी :** तुम्ही ? काही गडबड तर नाही ना ? काही विशेष ? विशेष घडलं ?

**कारखानीस :** हो विशेषच...पण तुला वाटतं तसं काही नाही.

**पद्मिनी :** मिसेस कारखानीस—

**कारखानीस :** ठीक आहे. म्हणजे अशा परिस्थितीत जेवढी असू शकते तेवढी ठीक आहे.

**पद्मिनी :** त्यांना एकटं सोडून आलात ?

**कारखानीस :** एक आया आहे जवळ. तशी काही काळजी नाही.

**पद्मिनी :** मग आता—

**कारखानीस :** मी तुला न्यायला आलोय.

**पद्मिनी :** मला न्यायला ? काय बोलता काय ? कुठे ?

**कारखानीस :** घरी. माझ्या घरी.

**पद्मिनी :** तुमच्या घरी ? काहीतरीच काय ? मी तुमच्या घरी कशी येणार ? हॉस्पिटलची गोष्ट वेगळी होती. तेव्हा त्या शुद्धीवरही नव्हत्या. आता—

**कारखानीस :** आता शुद्धीवर आहे. तिनंच मला पाठवलंय. तुला आणायला

**पद्मिनी :** त्यांनी पाठवलं.. मी...मी समजले नाही. त्यांनी मला कशासाठी बोलवलंय ?

**कारखानीस :** तिला सगळी कल्पना आहे. आपल्याबद्दल.

**पद्मिनी :** कुणी सांगितलं ?

**कारखानीस :** थोडं फार शेजाऱ्यांनी, थोडं फार हितचिंतकांनी—उरलेलं मी.

**पद्मिनी :** म्हणूनच त्यांनी—

**कारखानीस :** नाही, तिनं आत्महत्येचा प्रयत्न केला तो परावलंबी आजारपणाला कंटाळून. मला मोकळं करण्याचाही तिचा उद्देश असेल कदाचित. का होईना. सुरुवातीला तिला आशा होती. मलाही होती, की ती आजारातून सावरेल आणि आपला हौसेचा संसार मांडू शकेल. पण तसं झालं नाही. बिछान्याची तिची गाठ जास्त जास्त पक्की होत गेली. तिला तिळ तिळ तुटताना मी पाहिलं आहे पद्मिनी. खरं तिनं मला मनानं कधीच सोडचिठ्ठी दिली होती. फार पूर्वी. पण मलाच ते पटलं नाही. एक आदर्श पती बनून तिच्या आजारपणात गुंतून राहिलो मी. कदाचित या आधी—या आधी तू माझ्या आयुष्यात आली असतीस तर—

**पद्मिनी :** जर आणि तर. केवळ स्वप्नरंजन. निष्फळ. निरर्थक.

**कारखानीस :** पुढेमागे आपण लग्न करणार आहोत. जो थोडा वेळ उरला आहे हक्काचा, तो का वाया दवडायचा ? वैचारिक भूमिकेतून पाहा पद्मिनी. बी प्रॅक्टिकल. लॉजिकल. आपण आपलं सहजीवन सुरू करायला काय हरकत आहे ?

**पद्मिनी :** सहजीवन ? तुम्ही, मिसेस कारखानीस आणि मी ?

**कारखानीस** : तिची इच्छा आहे तशी. सतरा वर्षांचं प्रायश्चित्त घ्यायचं आहे तिला.

**पद्मिनी** : माझा बळी देऊन ? तिची इच्छा ! माझ्या इच्छेचं काय ?

**कारखानीस** : पद्मिनी, मला वाटलं तुझं माझ्यावर—

**पद्मिनी** : आहे. म्हणूनच एखाद्या रखेलीसारखं तुमच्याजवळ राहणं मला मानवणार नाही. आपण दोघंही विवाहित आहोत हे विसरता तुम्ही.

**कारखानीस** : कागदोपत्री. आपल्या दोघांच्या विवाहाला अर्थ उरलेला नाही. तुझा डिवोर्स दोन-तीन महिन्यांत मंजूर होईल. आणि—आणि—

**पद्मिनी** : शेजारी काय म्हणतील ? बँकेत लोक काय म्हणतील ?

**कारखानीस** : मला पर्वा नाही. आता मला स्वतःसाठी जगायचं आहे. मीही माणूस आहे पद्मिनी. पुरुष आहे—

**पद्मिनी** : प्लीज–तुम्ही–मी गोंधळून गेले आहे...इतक्यात रिबेका आणि तिचा नवरा यायचे आहेत इथे—

**कारखानीस** : मी निघतो. विचार कर.

[ कारखानीस जातात. पद्मिनी खोलीत येते यांत्रिकपणे. फोन खणाणतो, पण तिचे लक्ष जात नाही. ती विचार करीत खिडकीजवळ उभी. शेवटी आतून मामी धावत बाहेर येतात. ]

**मामी** : अग अग, जरा फोन तरी बघ ना, नुसती उभी आहेस तर ( फोन उचलतात ) हॅलो–हॅलो–अरेच्या ! ( फोन ठेवते ) कट् केला. माझा आवाज आवडला नाही वाटतं मेल्याला. ( दाराची घंटा वाजते ) अगबाई आलं आलं मेहूण.—[ मामी लगबगीने दार उघडतात. रिबेका आणि टोनी आत येतात. मामी रिबेकाचा मुका घेतात. ] वेलकम ! सेवाताई, आलीऽ रिबेका आणि तिचा नवरा—तिचे यजमान.

[ सेवाताई बाहेर येतात. ]

**सेवा** : या, या, या, तुमचीच वाट पाहतोय. या ना—

[ खोलीत येतात. पाठोपाठ मामी, रिबेका आणि टोनी. ]

**मामी** : जावईबापू बसा.

[ सगळे हसतात. पद्मिनी अजून व्यग्र आहे, पण स्वतःला सावरून ती आनंद सोहळ्यात सहभागी होण्याचा प्रयत्न करते. ]

**पद्मिनी** : सेवाताई, मी फराळाचं घेऊन येते.

[ आत जाते. ]

**सेवा** : आजच निघणार ना दुपारी ?

**रिबेका** : हो. विमानानं जाणार आम्ही. आयम् सो एक्साइटेड.

**सेवा** : हनीमूनहून परत मुंबईला येणार लगेच ?

**टोनी :** अं. नाही.. गोव्याला जाऊ तिथून. माझ्या आईवडिलांकडे.
(पद्मिनी ट्रे घेऊन येते. सगळ्यांना बश्या देते.)

**मामी :** ए आता घास भरवा पाहू. टोनी बायकोला घास भरवा—
(रिबेका लगेच "आ" वासते.)
इश्श, हे ग काय! जरा तरी लाजावं नवऱ्यामुलीनं. हे काय आपलं एवढा मोठा "आ" वासलास.
(रिबेका, खोटं खोटं लाजून बसते. काही केल्या तोंड उघडत नाही. सगळे हसतात.)

**सेवा :** खरोखर परीकथाच घडली हो ही.

**मामी :** राजकन्येचं राजपुत्राशी लग्न झालं आणि ती दोघं सुखाऽनं राहू लागली.

**रिबेका :** दे लिव्हड् हॅपिली एव्हर आफ्टर—
(फोन वाजतो)

**मामी :** मघापासून कोणीतरी फोन करतोय. 'हॅलो' म्हटलं की खाली ठेवतो.
(रिबेका ताडकन् उठते.)

**रिबेका :** थांबा, मी पाहते. टोनी, तू पण चल.
(दोघं फोनजवळ जातात. रिबेका फोन उचलते.)
हॅलो-हॅलो गोवर्धन. हो, हो, मीच बोलते आहे. रिबेका जोसफ—आता रिबेका अल्वारिस. माझं लग्न झालं गोवर्धन. आज सकाळी..तुझं काम मी अगोदरच करून टाकलं. माझ्या लग्नाआधीचा सारा इतिहास त्याला सांगून टाकला बघ. काही म्हणून शिल्लक ठेवलं नाही तुझ्यासाठी. विश्वास नाही बसत! बोल त्याच्याशी. हां, टोनी—
[टोनी फोन घेतो.]

**टोनी :** हॅलो. हॅलो—ठेवला त्यानं फोन.

**सेवा :** कुठून आणलंस एवढं बळ रिबेका! त्या गोवर्धनचं नुसतं नाव ऐकलं की हिचा थरकाप उडायचा.

**मामी :** घाबरून ससा व्हायची. हलकट मेला. नाव गोवर्धन पण नंबर एकचा कसाई.

**सेवा :** जाऊ दे. कुणी पुन्हा त्या गोवर्धनचं नाव काढायचं कारण नाही. त्या प्रकरणावर आता कायमचा पडदा पडला.

**टोनी :** नाही. पडदा नाही पडायचा एवढ्यात. सेवाताई, हा गोवर्धन ब्लू फिल्म्सच्या रॅकेटमध्ये आहे. पुरावा गोळा करताहेत माझे काही कलीग्स, त्याचा व्यवस्थित आणि कायमचा बंदोबस्त करणार आहे मी, आम्ही परत आलो म्हणजे. अशी माणसं तुरुंगात बरी.

**मामी :** शाबास. म्हणजे रिबेका, तुझ्या डेव्हिडनं त्याला तसा धडा शिकवला, आता टोनी हा असा धडा शिकवणार तर—

[ सेवाताई डोळे वटारतात. टोनी रिबेका क्षणभर अवघडलेले. ]

**टोनी :** बरं मग निघू आम्ही ? छान झाले होते— अं—अनरसे.

**मामी :** रिबेका पाया पड जायच्या आधी, पुढे सासूसासऱ्यांना भेटायचं आहे ना ? आमच्यावर प्रॅक्टिस कर थोडी.

**सेवा :** मामी—त्यांच्यात नाही पायाबिया पडत.

**मामी :** ( हिरमुसल्या ) नाही का ?—पण आपल्यात पडतात ना ? पड ग.

[ रिबेका, आणि टोनी सेवाच्या, मामींच्या पाया पडतात. रिबेका पद्मिनीला बिलगते. टोनी सूटकेस उचलतो. ]

**रिबेका :** माझा टेडी—

**मामी :** आता टेडी कशाला ?

[ सगळे हसतात. निरोप द्यायला दारापर्यंत जातात. रिबेका रेंगाळते. पुन्हा सगळ्यांचा अश्रुपूर्ण निरोप घेते. टोनी बाहेर पडतो. पाठोपाठ रिबेकाही—सेवा ट्रे घेऊन आत जाते, पद्मिनी आणि मामी खोलीत येतात. काही क्षण स्तब्धता. ]

**मामी :** दोघीच उरलो आता.

**पद्मिनी :** मामी......मामी मी पण जाणार आहे, ही खोली सोडून—

**मामी :** काय ? म्हणजे ? तू—परत जाणार ? नवऱ्याकडे ?

**पद्मिनी :** नाही, ती वाट परतीची नव्हती. मी–दुसरीकडे जाणार आहे....जिथे माझी गरज आहे...

**मामी :** समजले...पद्मिनी काय करते आहेस तू हे ? तू–असं करावंस ? तुझे आदर्श–तुझी तत्त्वं–कुठे गेली ? नीतिमत्ता आणि कर्तव्य-—

**पद्मिनी :** शब्द ! पोकळ शब्द—

**मामी :** कधी जाणार तू ?

**पद्मिनी :** मला बळ आलं म्हणजे, परवा–उद्या–कदाचित आज. लवकरच...सेवाताईंना भेटून येते. त्यांना कल्पना द्यायला हवी.

[ पद्मिनी आत जाते. मामी लेस काढतात. भकास. खिडकीजवळ विणायला बसतात. रेडिओवरून गाण्याचे सूर. सुहाग रात्रीचं गाणं. मामी खिडकी लावतात. रेडिओचा आवाज जास्तच मोठा भासू लागतो. ]

**मामी :** बंद करा—बंद करा हे गाणं. मुद्दाम मला चिडवायला हे गाणं लावलंय रेडिओवाल्यांनी. पाहून ठेवलंय मी. माझी चेष्टा करतात. लक्षात ठेवा. मी बघून घेईन. बंद करा...ही लेस—कुणाच्या लग्नासाठी मी पडदे विणू ? का म्हणून ? शरम नाही वाटत...लग्न करतात. मजा मारतात. आणि हे—हे असलं काम मला सांगतात ? सगळे हरामखोर. रिबेका पद्मिनी—

[ लेस उसवतात. हसतात. हळूहळू पिसाट होऊ लागतात. सेवा धावत येते. ]

इथून तिथून सगळ्या हरामखोर. अब्रूची चाड नाही कुणाला. गाणी गाताहेत. मला हिणवण्यासाठी—बंद करा.

[ स्तिमित होऊन सेवा क्षणभर पाहात उभी. मग ती मामींच्या रोखाने सरसावते तिला पाहून मामी अधिकच बिथरतात.] नको ! मामंजी नको. मी पाया पडते तुमच्या. पुढे होऊ नका. मला हात लावू नका...खबरदार. माझ्या हातात चाकू आहे.

[ मामींच्या हातात कात्री. त्या भेसूर हसतात. पद्मिनी त्वरेने आत येते आणि धावत जाऊन फोन उचलते आणि नंबर फिरवू लागते. मामी आणि सेवाताईंची झटापट चालू ].

**सेवा :** मामी, मामी शांत व्हा. मी सेवा—सेवाताई—

[ मामींचे पिसाट हसणे. हळूहळू काळोख.

पुन्हा प्रकाश उजळतो तेव्हा सेवाताई फोनवर बोलताहेत. ]

**सेवा :** हॅलो...नारी सहायक समिती ? मी सेवा श्रॉफ. माझ्याकडे पेइंग गेस्ट्ससाठी जागा आहेत. तीन ! हो हो. गरजू आणि असहाय अशाच स्त्रियांना निवारा देण्याचा संकल्प आहे माझा. हो. बरोबर...

( संगीत वाढत जाते. हळूहळू सेवाचे संभाषण त्यात बुडून जाते. फक्त सेवाताईंचे ओठ हालत राहतात. शब्द ऐकू येत नाहीत. काळोख ).

[ पडदा ]

IRBK-0121865